दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २२५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.०६ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## नेपाळमधील भीषण महाप्रलयाच्या ११ दिवसानंतर चमत्कार, ढिगाऱ्यातून महिलेला जिवंत बाहेर काढले

काठमांडू दि.५ (वृत्तसंस्था)- नेपाळच्या नुवाकोट जिल्ह्यामधील बेत्रावती भागातील मदत आणि बचाव कार्य सुरु असताना एक आश्चर्यजनक घटना घडली आहे. त्रिशुली नदीमध्ये आलेल्या महापुरानं आणि जमीन खचल्याच्या ११ दिवसानंतर एका महिलेला ढिगाऱ्यातून जिवंतपणे बाहेर काढण्या आलं आहे. ही महिला बिदूर महापालिका-१० या भागातील रहिवासी असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्या महिलेचं नाव चंदिका श्रेष्ठ असं आहे, त्यांचं वय ५५ ते ५६ वर्षांदरम्यान असल्याचं सांगितलं जातंय. मिळालेल्या माहितीनुसार चंदिका श्रेष्ठ या आनंद श्रेष्ठ यांच्या घरामध्ये ढिगाऱ्यात अडकल्या होत्या. महापुरामुळं घराचा एक भाग माती आणि ढिगाऱ्यात दबला होता. शनिवारी सुरक्षा दलांनी त्या महिलेला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं. नुवाकोटचे पोलीस अधिकारी बिपिन रेग्मी यांच्यानुसार ढिगाऱ्यमुळं खचलेल्या घरातून माणसाचा आवाज येत असल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली होती. यानंतर पोलीस आणि बचावपथकांनी घटनास्थळी पोहोचून ढिगारा हटवण्यास सुरुवात केली. खूप सतर्कतेनं ढिगारा बाजूला केल्यानंतर महिलेला जिवंत बाहेर काढण्यात आलं. महिलेला सुखरुप बाहेर काढताच घटनास्थळी असलेल्या व्यक्तींनी आनंद व्यक्त केला. बचाव पथकाच्या सदस्यांच्या माहितीनुसार चंदिका श्रेष्ठ ढिगाऱ्यात असूनही ती बोलू शकत होती. ढिगाऱ्यातून बाहेर काढल्यानंतर महिलेला जवळच्या आरोग्य केंद्रात नेण्यात आलं आहे. दीर्घकाळ ढिगाऱ्यात अडकल्यानंतर देखील महिलेला जिवंत बाहेर काढणं हे आश्चर्यजनक घटना मानली जातेय.

## राज्यभरात दहीहंडी जल्लोषात साजरी; मुख्यमंत्री फडणवीसांनी मुंबईत फोडली हंडी

### मुंबईत ९ व्या थरावरून गोविंदा कोसळला; ११८ गोविंदा जखमी

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- राज्यभरात आज दहीहंडी उत्सव अत्यंत उत्साहात आणि मोठ्या जल्लोषात साजरा केला. यंदा विविध दहीहंडी आयोजक आणि मंडळांकडून निष्णात गोविंदा पथकांसाठी लाखो रुपयांची आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आले होते. याशिवाय, अनेक नामांकित हंड्यांच्या ठिकाणी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलाकारांची खास उपस्थिती हे यंदाच्या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले.

दरम्यान, दिवसभरात दहीहंडी उत्सवात एकूण ११८ गोविंदा जखमी झाले असून यामधील पाच गोविंदा हे ॲडमिट करण्यात आले आहेत तर ८० गोविंदांवर उपचार सुरू आहेत तर ३३ गोविंदांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

२००९ सालच्या अशाच एका दुर्घटनेत थरावरून कोसळल्यामुळे नागेश भोईर हा गोविंदा गंभीर जखमी झाला होता आणि तेव्हापासून तो अंथरुणाला खिळून आहे. यंदाच्या उत्सवातही काही गोविंदा जखमी झाल्याच्या घटना ताज्या असतानाच, मंत्री प्रताप सरनाईक यांनी एक दिलासादायक निर्णय घेत गेल्या अनेक वर्षांपासून अंथरुणात खितपत पडलेल्या नागेश भोईरच्या पुढील उपचारांचा संपूर्ण खर्च उचलण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे.

ठाण्यात आमदार प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडी उत्सवात 'आर्यन्स गोविंदा पथका'ने तब्बल १० थर रचून जागतिक विक्रमाचा प्रयत्न केला. १० थर यशस्वीरीत्या रचले गेले; मात्र १० वा गोविंदा पूर्ण उभा राहण्यापूर्वीच सर्व थर कोसळले.

मुंबईतील घाटकोपर येथे मनसे नेते गणेश चुक्कल यांच्या वतीने आयोजित दहीहंडी उत्सवात एक थरारक घटना घडली आहे. अंधेरी पूर्व येथील 'अखिल मालपा डोंगरी' गोविंदा पथकाने यंदाच्या मोसमातील मुंबईतील पहिले ९ थर यशस्वीरीत्या उभारण्याचा विक्रम रचला; मात्र ९ वा थर उतरत असताना वरचा गोविंदा तोल जाऊन खाली कोसळला.

मुंबईत दहीहंडीच्या उत्सवाला गालबोट लागले असून शनिवारी दुपारी एका इमारतीचा खांब कोसळून सात वर्षांच्या (पान ४ वर)



## मराठा आंदोलक जरांगे यांच्याकडून पुन्हा पाणी, सलाईन व वैद्यकीय उपचार न घेण्याचा निर्णय

जालना दि.५ (प्रतिनिधी)- भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या बेमुदत उपोषणा दरम्यान, त्यांची भेट घेतली. खालावलेली प्रकृती पाहता जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर तात्काळ कारवाई सुरू करून मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी त्यांच्याच हस्ते हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र वाटप केले जाईल, असा सरकारच्या वतीने शब्द दिला. त्यामुळे जरांगे पाटील यांनी लाड यांच्या विनंतीला मान देत पाणी घेतले आणि सलाईन लावून घेण्याची तयारी दर्शवली.

दोन दिवसांपूर्वी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी पुन्हा त्यांची भेट घेत सरकारकडून सुरू असलेल्या कारवाईची माहिती देत त्यांच्या मागण्यावर सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा शनिवारी(ता.५) आठवा दिवस आहे. मात्र माघारी गेलेल्या सरकारच्या शिष्टमंडळाकडून पुन्हा चालढकल सुरू असल्याचा आरोप करत जरांगे पाटील यांनी केला. तसेच आजपासून पुन्हा पाणी, सलाईन व वैद्यकीय उपचार न घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाने सरकारचे टेन्शन वाढणार असून हे आंदोलन अधिक चिघळण्याची शक्यता आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनाची मुदतीत पूर्तता न केल्यामुळे आपण पाणी, सलाईन न घेण्याचा निर्णय घेतल्याचे जरांगे पाटील यांनी सांगितले. वैद्यकीय तपासणी करण्यासाठी आलेल्या डॉक्टरांनाही त्यांनी माघारी पाठवले. काही प्रमुख मागण्या दोन दिवसांत पूर्ण केल्या जातील, असे आश्वासन राज्यातील महायुती सरकारने जरांगे पाटील यांना दिले होते. मात्र, दिलेल्या वेळेत सरकारने कोणतीही ठोस पावले न उचलल्याने त्यांनी हा निर्णय घेतला. जोपर्यंत आमच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी सरकारकडून प्रत्यक्षात होत नाही, तोपर्यंत मी काहीही घेणार नाही आणि उपचारही करून घेणार नाही, असे जरांगे पाटील यांनी वैद्यकीय तपासणीसाठी आलेल्या पथकाला सांगितले. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आजचा आठवा दिवस आहे. मंत्र्यांच्या शिष्टमंडळाची शिष्टाई यशस्वी न झाल्याने जरांगे यांचे उपोषण सुरूच आहे. सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी झाल्याशिवाय उपोषण मागे न घेण्याचा निर्धार जरांगेनी केला आहे. दरम्यान, जरांगेच्या मागण्यांवर एक ते दोन दिवसात निर्णय कळवू अशी भूमिका शिष्टमंडळाने जाहीर केली आहे.

दरम्यान, मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची जरांगे पाटील यांच्या पाणी आणि सलाईन न घेण्याच्या निर्णयावर प्रतिक्रिया आली आहे. जरांगे पाटील यांच्या या निर्णयाने आपल्याला धक्का बसला आहे. दोन दिवसांपूर्वी आम्ही त्यांची भेट घेऊन सरकार घेत असलेल्या निर्णायाची माहिती दिली होती. पुन्हा आमचे अधिकारी आम्ही अंतरवाली सराटीमध्ये पाठवू. जरांगे पाटील यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, असे विखे पाटील म्हणाले.

## छगन भुजबळ रस्त्यावर उतरले तर तन-मन-धनाने आम्ही त्यांच्या सोबत; राष्ट्रीय ओबीसी महासंघाकडून समर्थन

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- छगन भुजबळ रस्त्यावर उतरले तर राष्ट्रीय ओबीसी महासंघ देखील तन-मन-धनाने त्यांच्या सोबत राहणार, अशी भूमिका राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी घेतली आहे. सरकारकडून मराठा समाजाला आणि ओबीसी समाजाला दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधेत मोठी तफावत आहे. ज्या सोयी सवलती मराठा समाजाला मिळतात, त्या सर्व सोयी सुविधा ओबीसी समाजाला देण्याचा शासन निर्णय काढण्यात यावा, अशी मागणीही डॉ. तायवाडे यांनी केली आहे.

दरम्यान, मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत बोलताना डॉ. बबनराव तायवाडे म्हणाले की, सरकारचे मंत्री थेट आंदोलनस्थळी जातात. मात्र इतर समाजातील आंदोलन झाल्यावर त्यांना मंत्रालयात बोलावतात आणि त्याची अंमलबजावणी देखील होत नाही. मराठा आंदोलकासोबत सरकारची भूमिका आणि ईतर समाजाच्या आंदोलनाबाबत सरकारच्या भूमिकेत दूजाभाव असल्याचा आरोपही डॉ. बबनराव तायवाडे यांनी यावेळी केला आहे.

## लष्कर-ए-तैयबाचा पाकिस्तानी कमांडर ठार; जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दलाची कारवाई

श्रीनगर दि.५ (वृत्तसंस्था)- जम्मू-काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यात भारताच्या सुरक्षा दलाने एक मोठी कारवाई केली आहे. बडगाम जिल्ह्यात सुरक्षा दलाने केलेल्या कारवाईत लष्कर-ए-तैयबाचा एक पाकिस्तानी कमांडर ठार करण्यात यश आलं आहे. बडगाम जिल्ह्यातील युसमार्गच्या उंच भागात दहशतवादी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने शोध मोहीम सुरू केली होती.

त्यानंतर झालेल्या चकमकीत 'यासिर' नावाचा पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबाचा कमांडर मारला गेला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी काश्मीरमधील बडगाममध्ये या कमांडरबाबत सुरक्षा दलाला गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर सुरक्षा दलांनी या भागात शोध मोहीम सुरू केली होती. यावेळी झालेल्या चकमकीत हा लष्कर-ए-तैयबाचा कमांडर मारला गेला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

दरम्यान, यासिर हा लष्कर-ए-तैयबाच्या 'सुलेमान मुसा' या मोठ्या गटाचा भाग होता. वर्षभरापूर्वी तो या गटापासून वेगळा झाला होता आणि तेव्हापासून तो स्वतंत्रपणे कार्यरत होता. सुरक्षा यंत्रणा त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून होत्या. मागील काही काळापासून युसमार्ग भागात तो असल्याचा संशय होता.

सूत्रांच्या माहितीनुसार, यासिर हा या भागात लष्कर-ए-तैयबाचा एक प्रमुख सदस्य म्हणून उदयास आला होता. युसमार्गच्या उंच भागात तो असल्याचा संशय असल्याने सुरक्षा दलांनी शोध मोहीम हाती घेतली होती. तसेच जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दलांकडून दहशतवादविरोधी कारवाया तीव्र केल्या जात असतानाच त्याच्याबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी मोठी करवाई करत त्याचा खात्मा केला आहे.

दरम्यान, यासिरच्या मृत्यूनंतर आता तपास यंत्रणा त्याचं नेटवर्क, 'लष्कर-ए-तैयबा'च्या इतर सदस्यांशी असलेले त्याचे संबंध आणि या भागात त्याच्या कारवायांची व्याप्ती याचा तपास करत आहेत.

या दहशतवाद्याचा खात्मा करण्यात आल्यानंतर घटनास्थळावरून एके-४७ रायफलसह इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे. ठार झालेला हा दहशतवादी पाकिस्तानी नागरिक असल्याचं तपासातून समोर आलं आहे.

### केतन अग्रवाल हत्या प्रकरण
## चेतन चौधरी आणि सिया गोयलच्या मित्राला अटक, व्हॉट्सॲप चॅटमधून धागा

पुणे दि.५ (प्रतिनिधी)- लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवाल या तरुणाची हत्या केल्याच्या बहुचर्चित प्रकरणाला आता नवं वळण मिळालं आहे. या प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी आणखी एका व्यक्तीला अटक केली आहे. रितेश हिंगे असं अटक करण्यात आलेल्या तरुणाचं नाव असून तो मुख्य आरोपी चेतन चौधरी आणि सिया गोयल यांचा वर्गमित्र असल्याची माहिती समोर आली आहे. हत्येच्या कटाची माहिती रितेशला आधीपासून होती, मात्र त्याने याबाबत पोलिसांना माहिती दिली नसल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे.

केतन अग्रवाल हत्या प्रकरणात यापूर्वी त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा मित्र चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली होती. आता रितेश हिंगेच्या अटकेमुळे या प्रकरणात आरोपींची संख्या तीन झाली आहे. रितेशला वडगाव मावळ न्यायालयात हजर करण्यात आलं. न्यायालयाने त्याला १२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

तपासादरम्यान (पान ४ वर)

## सुभाष चंद्रा यांच्याविरोधात सीबीआयकडून गुन्हा दाखल; १,३२२ कोटींच्या फसवणुकीप्रकरणी कारवाई

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- 'झी' समूहाचे संस्थापक आणि 'एस्सेल समूहा'चे अध्यक्ष सुभाष चंद्रा यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडची १,३२२ कोटी रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने सुभाष चंद्रा यांच्यासह अनेक कंपन्या आणि त्यांच्या संचालकांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. स्वतः ची संपत्ती फुगवून दाखवत कर्ज मिळवले आणि नंतर ते फेडले नाही, असा प्राथमिक आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

सीबीआयच्या 'बँकिंग सिक्युरिटीज फ्रॉड शाखे'ने ३१ ऑगस्ट रोजी याप्रकरणी एफआयआर नोंदवला. एलआयसी हाऊसिंग फायनान्सच्या महाव्यवस्थापक नीता मेंघाणी यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. २०१८ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन वेगवेगळ्या कर्जप्रकरणांमध्ये चंद्रा यांनी वैयक्तिक हमी दिली होती. मात्र हे कर्ज थकित राहिल्याने सार्वजनिक क्षेत्रातील या वित्तीय संस्थेला व्याज आणि इतर शुल्कासह १,३२२ कोटी रुपयांपेक्षा अधिक नुकसान सहन करावे लागले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सीबीआयने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये सुभाष चंद्रा यांच्याव्यतिरिक्त वसंत सागर प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड आणि तिचे संचालक पंकज सुरोलिया, पॅन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, डिजिटल सबस्क्रायबर मॅनेजमेंट अँड कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा. लि. आणि (पान ४ वर)

## भर चौकात १७ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीवर चाकू हल्ला

अमरावती दि.५ (प्रतिनिधी)- अमरावती शहरातील रवी नगर चौकात एका १७ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीवर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एकतर्फी प्रेमातून हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती आली होती, पोलीस या प्रकरणी आरोपीला पकडलं पण त्याला त्याच्या या कृत्याचा जराही पश्चाताप नव्हता असं चित्र दिसून आलं शोधात आहे, या प्रकरणी सखोल माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या दोन वर्षांपासून तरूणी आरोपीशी चांगली बोलत होती, अचानकच तिने त्याच्याशी बोलणे का बंद केले, याचा जाबही त्याने तीला विचारला होता. त्याचा तगादा आणि त्रास तिच्या सहन होत नव्हता. म्हणून तिने त्याच्याशी बोलणं पूर्णपणे बंद केलं. ती त्याला टाळत होती. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून तो संतापला होता. याच संतापाच्या भरात त्याने तिला संपवलं, गुरुवारी पोलिसांनी जेव्हा त्याला पकडले, त्याला न्यायलयाने कोठडी सुनावली, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर पश्चातापाचा लवलेशही दिसत नव्हता.

## राज्य सरकारकडून भरती प्रक्रियेतील गैरप्रकार रोखण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेली अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षक पदाची भरती प्रक्रिया पेपर फुटल्यानं रद्द करण्यात आली. त्यापूर्वी पेपरफुटीमुळं टीईटी परीक्षा देखील रद्द करत लांबवणीवर टाकण्यात आली. पेपरफुटीच्या मुद्यावरुन राज्यातील तरुणांमध्ये मोठा रोष पाहायला मिळत होता. अखेर राज्यातील भरती प्रक्रियांमध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून उच्च स्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये राज्याच्या प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील कर्मचारी भरती पद्धतीत सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारकडून उच्चस्तरीय समितीची स्थापन करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या समितीमध्ये पोलीस महासंचालक सदानंद दातेंसह, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम,इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, यूपीएससीचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले,आयआयटी मुंबईचे प्रा.श्यामप्रसाद करगड्डे यांचा ७ सदस्यांचा समितीत समावेश आहे.

विविध विभागात राबविण्यात येणाऱ्या भरती परीक्षा, कार्यपद्धती व इतर आवश्यक बाबींचा उच्च स्तरीय समिती अभ्यास करेल. विद्यमान परीक्षा पध्दतीचे पुनर्विलोकन करून त्यात बदल (पान ४ वर)

## रशिया-युक्रेन यांच्यात ३ दिवसांचा युद्धविराम; दोन्ही देश एकमेकांवरील हल्ले थांबवणार

मॉस्को दि.५ (वृत्तसंस्था)- रशियाचे राष्ट्रपती व्लादीमीर पुतिन यांनी ३ दिवसांसाठी युक्रेनची राजधानी कीववरील हल्ले रोखण्याचे आदेश दिले आहेत. आज रात्रीपासून रशियन सैन्य कीववर बॉम्ब हल्ले थांबवणार आहे. त्यामुळे रशिया-युक्रेन यांच्यात युद्धविरामाच्या दिशेने हालचाली सुरू झाल्याचं दिसून येते. मागील काही दिवसांपासून रशियाने कीववर मोठ्या प्रमाणात हल्ले केले होते. या हल्ल्यात अनेक युक्रेनी नागरिकांचा मृत्यू झाला. त्याशिवाय मोठ्या पायाभूत सुविधाही उद्ध्वस्त झाल्या आहेत.

क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी सांगितले की, युक्रेनमधील संघर्षावर चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे विशेष दूत जेरेड कुशनर आणि स्टीव्ह विटकॉफ मॉस्कोमध्ये दाखल झाल्यानंतर रशिया युक्रेनच्या राजधानीवरील हल्ले थांबवेल. कीववरील हल्ल्यांमधील हा विराम तेथील अमेरिकी वाटाघाटीकारांसोबत होणाऱ्या बैठकांच्या तयारीशी आणि आयोजनाशी संबंधित आहे. रशियाचे राष्ट्रपती शनिवारी क्रेमलिनमध्ये अमेरिकी वाटाघाटीकार स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांची भेट घेती असं त्यांनी सांगितले.

रशियन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट फंडाचे प्रमुख आणि राष्ट्रपतींचे विशेष दूत किरिल दिमित्रीव्ह यांनी व्नुकोव्हो विमानतळावर अमेरिकी वाटाघाटीकारांची भेट घेतली. यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केली होती की त्यांचे दूत युक्रेन संघर्ष संपवण्यासाठी प्रस्ताव सादर करतील. तर रशिया संवादासाठी तयार आहे आणि व्हाईट हाऊसच्या प्रतिनिधींचे रशियामध्ये नेहमीच स्वागत आहे असं रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांनी मंगळवारी सांगितले होते.

दरम्यान, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी शुक्रवारी रशियासोबत तात्पुरत्या युद्धविरामाचा प्रस्ताव ठेवला. जो अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दूतांच्या मॉस्को आणि कीव दौऱ्यात लागू असेल. आमच्या बाजूने कोणतेही हवाई हल्ले होणार नाहीत आणि रशियालाही तसेच करावे लागेल. या चर्चा आणि अमेरिका दौऱ्याशी संबंधित लॉजिस्टिकल समस्या सोडवण्यासाठी आवश्यक असलेल्या वेळेपर्यंत त्यांना शांतता राखावी लागेल. साडेचार वर्षांपासून सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी देशाला ठोस पर्याय हवे आहेत असं त्यांनी सांगितले.

## भाजपवाले जसे पक्ष फोडतात, तसे इंग्लिश मीडियमची मुले फोडा; गुलाबराव पाटलांचा शिक्षकांना अजब सल्ला

जळगाव दि.५ (प्रतिनिधी)- मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठी शाळांकडे वळवा, असा अजब सल्ला मंत्री गुलाबराव पाटील यांनी शिक्षकांना दिला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची तुलना भाजपच्या पक्षफोडीच्या राजकारणाशी केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे कार्यक्रमात हशा पिकला असून, त्यांच्या विधानाची सध्या चर्चा सुरू आहे.

जळगाव जिल्ह्यात शिक्षक दिनानिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जिल्ह्यातील १५ शिक्षकांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. यावेळी मंत्री गुलाबराव पाटील यांनी शिक्षक, मराठी शाळा आणि विद्यार्थ्यांच्या पटसंख्येबाबत भाष्य केले.

गुलाबराव पाटील म्हणाले की, सध्या मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या टिकवणे हे मोठे आव्हान बनले आहे. अनेक पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठवण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमधील पटसंख्या कमी होत आहे. यावर



बोलताना त्यांनी शिक्षकांना मिश्कीलपणे भाजपच्या राजकारणाचा दाखला दिला. ''ज्याप्रमाणे भाजपवाले कोणालाही आपल्या पक्षात घेतात, त्याप्रमाणे तुम्हीही इंग्लिश मीडियमची मुलं फोडली पाहिजेत आणि त्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेत आणलं पाहिजे,'' असा सल्ला त्यांनी दिला. त्यांच्या या वक्तव्यानंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

मराठी शाळांबाबत बोलताना गुलाबराव पाटील यांनी इंग्रजी भाषेचे महत्त्वही मान्य केले. जेवणात लोणचं जितकं आवश्यक असतं, तितकीच इंग्रजी आपल्याला आली पाहिजे; मात्र त्याचवेळी आपल्या मातृभाषेचा आणि मराठी भाषेचा आदर कायम ठेवला पाहिजे, असे ते म्हणाले. आजच्या काळात पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे वाढता कल दिसून येत आहे. त्यामुळे मराठी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आदर्श शिक्षक घडवायचे असतील तर मराठी शाळांची पटसंख्या वाढवणे गरजेचे आहे, असेही पाटील म्हणाले. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात यंदा १५ शिक्षकांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पूर्वी जिल्ह्यातील ७५ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जात होता. आता ही संख्या १५ वर आली आहे. मात्र पुरस्कार मिळाला नाही म्हणून एखादा शिक्षक आदर्श नसतो असे नाही. अनेक शिक्षक विद्यार्थ्यांना घडवण्याचे महत्त्वाचे काम करत आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# आव्हानांना सामोरं जाण्याचा माईंडसेट

**आयुष्य** म्हणजे केवळ सुख-सुविधांचा प्रवास नाही; तो चढ-उतार, संघर्ष, अडचणी आणि अनिश्चिततेतून पुढे जाण्याचा प्रवास आहे. प्रत्येकाच्या वाट्याला आव्हाने येतात. कोणाच्या वाट्याला आर्थिक अडचणी येतात, कोणाला करिअरची चिंता असते, तर कोणाला नातेसंबंध, आरोग्य, सामाजिक दबाव किंवा बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचे आव्हान असते. मात्र अडचण ही प्रत्येकासाठी सारखी नसते आणि तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही प्रत्येकाचा वेगळा असतो. म्हणूनच आव्हानांपेक्षा महत्त्वाचा असतो तो आव्हानांना सामोरं जाण्याचा माईडसेट.

अडचण आली की घाबरणे स्वाभाविक आहे. अपयश मिळाले की निराश होणेही स्वाभाविक आहे. पण त्या भीतीत किंवा निराशेतच अडकून राहणे हा पर्याय नाही. परिस्थिती बदलण्याआधी अनेकदा आपला विचार बदलण्याची गरज असते. 'हे माझ्यामुळे होणार नाही' या विचाराऐवजी 'हे कठीण आहे, पण मी प्रयत्न करू शकतो' हा विचार मनात निर्माण झाला, तर संघर्षाची दिशा बदलते. आत्मविश्वास म्हणजे आपल्याला प्रत्येक गोष्ट जमेल असा अंधविश्वास नव्हे; तर अडचण आली तरी त्यातून मार्ग शोधण्याची स्वतःवरील श्रद्धा होय.

आजच्या काळात आव्हानांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या जगात कालपर्यंत उपयुक्त असलेले कौशल्य आज अपुरे ठरू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे, स्पर्धात्मक शिक्षण, बदलती रोजगारव्यवस्था आणि सतत बदलणाऱ्या सामाजिक अपेक्षा यामुळे प्रत्येकाला स्वतःमध्ये सातत्याने बदल करावा लागत आहे. या बदलाला घाबरणारा माणूस मागे पडतो; तर बदल समजून घेऊन त्यातून संधी शोधणारा पुढे जातो.

यासाठी सर्वप्रथम अपयशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. अपयश म्हणजे शेवट नसतो. उलट ते आपल्या चुका दाखवणारा आरसा असते. एका परीक्षेत अपयश आले म्हणून आयुष्य संपत नाही, व्यवसायात नुकसान झाले म्हणून क्षमता संपत नाही किंवा एखादी संधी हातातून गेली म्हणून पुढच्या सर्व संधी बंद होत नाहीत. अपयशातून शिकण्याची तयारी असेल, तर तेच अपयश भविष्यातील यशाची पायरी बनू शकते.

आव्हानांचा सामना करताना आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे समस्येवर नव्हे, उपायावर लक्ष केंद्रित करणे. 'ही समस्या का आली?' या प्रश्नाबरोबरच 'आता पुढे काय करता येईल?' हा प्रश्न विचारण्याची सवय लागली पाहिजे. परिस्थिती आपल्या नियंत्रणाबाहेर असू शकते; परंतु त्या परिस्थितीवर आपण कशी प्रतिक्रिया देतो, हे बहुतांश वेळा आपल्या हातात असते. ही जाणीव माणसाला मानसिकदृष्ट्या अधिक मजबूत बनवते.

आज सोशल मीडियामुळे तुलना करण्याची प्रवृत्ती प्रचंड वाढली आहे. दुसऱ्याचे यश दिसते, संघर्ष दिसत नाही. दुसऱ्याचे सुख दिसते, त्यामागचा त्याग दिसत नाही. त्यामुळे स्वतःच्या आयुष्याबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. ही मानसिकता आव्हानांना सामोरं जाण्याची ताकद कमी करते. प्रत्येकाचा प्रवास वेगळा असतो, हे स्वीकारणे आवश्यक आहे. दुसऱ्याशी स्पर्धा करण्याऐवजी कालच्या स्वतःपेक्षा आज आपण किती पुढे आलो, याचा विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे.

माईडसेट मजबूत करण्यासाठी शिस्त, संयम आणि सातत्य या तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत. मोठे उद्दिष्ट एका दिवसात साध्य होत नाही. छोट्या-छोट्या प्रयत्नांची साखळी मोठे यश निर्माण करते. काही दिवस प्रयत्न करून परिणाम दिसला नाही म्हणून प्रयत्न सोडणे सोपे आहे; परंतु परिणाम दिसत नसतानाही योग्य दिशेने प्रयत्न सुरू ठेवणे हीच खरी मानसिक ताकद आहे.

आव्हानांच्या काळात योग्य माणसांची साथही तितकीच महत्त्वाची असते. समस्या मनात दडवून ठेवण्यापेक्षा विश्वासू व्यक्तींशी संवाद साधणे, सल्ला घेणे आणि गरज पडल्यास मदत मागणे यात कमीपणा नाही. उलट मदत स्वीकारण्याची तयारी ही परिपक्वतेचे लक्षण आहे. प्रत्येक लढाई एकट्यानेच लढावी लागते, हा गैरसमज दूर झाला पाहिजे.

आजच्या तरुणांसमोर संधींची कमतरता नाही; मात्र त्या संधींचा उपयोग करण्यासाठी मानसिक तयारी आवश्यक आहे. कौशल्याबरोबरच बदल स्वीकारण्याची क्षमता, टीका सहन करण्याची ताकद, अपयशातून उभे राहण्याची वृत्ती आणि सातत्याने शिकण्याची तयारी या गुणांची गरज आहे. पदवी मिळवणे महत्त्वाचे आहेच; पण बदलत्या जगात स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे त्याहून महत्त्वाचे ठरत आहे.

समाजाच्या पातळीवरही हीच मानसिकता आवश्यक आहे. आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय अडचणी आल्या की केवळ दोषारोप करण्याऐवजी समस्येवर सामूहिक उपाय शोधण्याची वृत्ती निर्माण झाली पाहिजे. संकटे कोणत्याही व्यक्तीला, संस्थेला किंवा समाजाला वगळत नाहीत. मात्र संकटातून कोण किती वेगाने सावरतो, यावर त्याची भविष्यातील वाटचाल ठरते.

खरे तर जीवनात आव्हाने नसतील तर प्रगतीची गरजही जाणवणार नाही. संघर्ष माणसाला स्वतःची ओळख करून देतो. संकटाच्या काळात आपली क्षमता, संयम आणि धैर्य यांची खरी परीक्षा होते. म्हणूनच आव्हानांकडे शत्रू म्हणून नव्हे, तर स्वतःला अधिक सक्षम बनवणारी संधी म्हणून पाहण्याची मानसिकता विकसित करणे गरजेचे आहे.

परिस्थिती नेहमी आपल्या मनासारखी असेलच असे नाही; पण त्या परिस्थितीला आपण कसे सामोरे जायचे, हे आपल्या हातात असते. पडणे टाळता येत नाही, पण पडल्यावर पुन्हा उभे राहणे आपल्या हातात असते. अपयश थांबवता येत नाही, पण त्यातून शिकणे आपल्या हातात असते. संकट टाळता येत नाही, पण संकटातून मार्ग काढण्याची जिद्द नक्कीच आपल्या हातात असते. आजच्या वेगवान आणि अनिश्चित जगात सर्वात मोठी गरज आहे ती केवळ ज्ञानाची किंवा पैशाची नाही, तर लढण्याची मानसिक तयारी आणि परिस्थितीनुसार स्वतःला बदलण्याची क्षमता यांची. आव्हाने येत राहतील, परिस्थिती बदलत राहील; पण मजबूत माईडसेट असलेला माणूस प्रत्येक संकटातून नवी दिशा शोधू शकतो.

म्हणूनच आव्हानांपासून पळण्याऐवजी त्यांच्याकडे डोळसपणे पाहूया. 'माझ्यासमोर समस्या आहे' एवढ्यावर न थांबता 'या समस्येतून मला काय शिकता येईल?' असा प्रश्न विचारूया. कारण शेवटी आव्हाने आपले भविष्य ठरवत नाहीत; त्या आव्हानांना आपण दिलेली प्रतिक्रिया आपले भविष्य घडवते.

# आयआयटी बॉम्बेची गोल्ड मेडलिस्ट ते जालन्याची जिल्हाधिकारी : अंतरवाली सराटीत संयमाने परिस्थिती हाताळणाऱ्या आयएएस आशिमा मित्तल नेमक्या कोण आहेत?

फक्त सरकारचीच बाजू मांडायची असेल तर निघून जा : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि जरांगे पाटील यांच्यातील संवाद सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

राज्य शासनाची भूमिका मांडण्यासाठी आंदोलनस्थळी गेलेल्या आशिमा मित्तल यांच्या समोर अत्यंत संवेदनशील परिस्थिती होती. मात्र, विरोधी भूमिका ऐकून घेत, संयम राखत आणि प्रशासनाची बाजू स्पष्टपणे मांडत त्यांनी संवाद सुरू ठेवला.

पण : अंतरवाली सराटीत चर्चेत आलेलं हे नाव अचानक चर्चेत आलेलं नाही. यामागे आहे एका अभ्यासू विद्यार्थिनीपासून देशातील सर्वात प्रतिष्ठेच्या प्रशासकीय सेवेत पोहोचलेल्या अधिकाऱ्याचा प्रवासः

IIT बॉम्बेः आणि राष्ट्रपतींच्या नावाने दिलं जाणारं सुवर्णपदक! आशिमा मित्तल यांनी IIT Bombay मधून सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये B.Tech पूर्ण केले. IIT बॉम्बेतील त्यांच्या शैक्षणिक कामगिरीची दखल घेत त्यांना Dr. Shankar Dayal Sharma Gold Medal प्रदान करण्यात आले. २०१४ च्या IIT Bombay दीक्षांत समारंभाशी संबंधित नोंदींमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंगमधील आशिमा मित्तल यांना हे सुवर्णपदक मिळाल्याची नोंद आहे. म्हणजे एका बाजूला देशातील सर्वोच्च तांत्रिक संस्थांपैकी एक असलेले IIT Bombay आणि दुसऱ्या बाजूला पुढे देशाच्या प्रशासनात काम करण्याचं स्वप्नः आणि त्यानंतर त्यांनी Anthro{ology म्हणजेच मानववंशशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले.

UPSC मध्ये थेट AIR 12!

२०१७ च्या UPSC Civil Services Examination मध्ये आशिमा मित्तल यांनी अखिल भारतीय स्तरावर १२वा क्रमांक मिळवला. UPSCच्या अधिकृत नोंदीत आशिमा मित्तल यांचे नाव १२व्या क्रमांकावर असून त्यांना १,१०० गुण मिळाल्याची नोंद आहे.

इथे एक गोष्ट विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. UPSC परीक्षा २०१७ निकाल २०१८ IAS बॅच २०१८ म्हणूनच काही ठिकाणी त्यांना “2018 UPSC” असं म्हटलं जातं; मात्र अधिकृत नोंदीनुसार त्यांची परीक्षा उडए २०१७ होती.

IAS होण्याआधी कॉर्पोरेट क्षेत्राचा अनुभव!

आशिमा मित्तल यांनी स्वतः IIT Bombay च्या E-Cell सोबतच्या संवादात सांगितले आहे की, IAS मध्ये येण्यापूर्वी त्यांनी MNC मध्ये काम केले होते. कॉर्पोरेट क्षेत्रातून भारतीय प्रशासकीय



सेवेत आल्यानंतर त्यांच्या दृष्टिकोनात मोठा बदल झाला, असं त्यांनी सांगितलं. कॉर्पोरेट क्षेत्रात ग्राहक हा केंद्रबिंदू असतो; तर प्रशासनात सामान्य नागरिकच आपला 'क्लायंट' आहे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली होती. हीच विचारसरणी पुढे त्यांच्या प्रशासकीय कामात दिसून आली.

महाराष्ट्रात आल्यानंतर कुठे-कुठे काम केलं?

IAS सेवेत आल्यानंतर महाराष्ट्र कॅडर मिळालेल्या आशिमा मित्तल यांनी प्रशिक्षणानंतर महाराष्ट्रातील विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या.

अहमदनगर - प्रशिक्षणार्थी / सहाय्यक जिल्हाधिकारी

त्यांच्या सुरुवातीच्या प्रशासकीय कारकिर्दीत त्यांनी अहमदनगर येथे Supernumerary Assistant Collector म्हणून काम केले.

त्यानंतर त्यांची नियुक्ती पालघर जिल्ह्यात झाली.

डहाणू - आदिवासी विकासाच्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव

Assistant Collector आणि Project Officer, Integrated Tribal DeveloPment Project (ITDP), Dahanu म्हणून त्यांनी काम केले. आदिवासी भागातील प्रशासन, विकास योजना आणि सरकारी यंत्रणा प्रत्यक्ष तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा अनुभव याच काळात त्यांना मिळाला. आणि याच काळात ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही संधींची कमतरता असते, हा अनुभव त्यांच्या पुढील कामासाठी महत्त्वाचा ठरला.

नाशिकमध्ये आल्यानंतर तयार झाला "SUPER 50'चा प्रयोग! २०२२ मध्ये आशिमा मित्तल यांची नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (CEO) नियुक्ती झाली. इथे त्यांनी शिक्षण क्षेत्रात वेगळा प्रयोग केला"Super 50'! ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील गुणवंत विद्यार्थ्यांना JEE, NEET सारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी चांगल्या सुविधा आणि मार्गदर्शन मिळावं, हा या उपक्रमामागचा उद्देश होता. पहिल्या टप्प्यात नाशिक जिल्हा परिषदेच्या शाळांमधील ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या विद्यार्थ्यांना निवासी व्यवस्था, शिक्षण, कोचिंग आणि इतर आवश्यक सुविधा देण्यात आल्या. प्रति विद्यार्थ्याला दोन वर्षांसाठी सुमारे १.५ लाख खर्च येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आणि निकाल?

५० पैकी २२ विद्यार्थ्यांनी JEE Main उत्तीर्ण केली. त्यानंतर ७ विद्यार्थ्यांनी JEE Advanced देखील उत्तीर्ण केली. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण आणि आदिवासी भागातील अनेक विद्यार्थी होते. आशिमा मित्तल यांनी यामागची भूमिका स्पष्ट करताना खखढ मध्ये शिकल्यामुळे शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या आकांक्षा कशा बदलू शकतात, यावर भर दिला होता.

"Super 50' थांबलं नाही :

हा प्रयोग पुढे आणखी मोठा करण्यात आला.

२०२४-२५ आणि २०२५-२६ साठी ११० विद्यार्थ्यांना JEE आणि NEETसाठी प्रशिक्षण देण्याची योजना नाशिक जिल्हा परिषदेने आखली. त्यात ५५ विद्यार्थी JEE आणि ५५ विद्यार्थी NEETसाठी तयार होणार होते. पुढे या उपक्रमातील विद्यार्थ्यांनी IIT आणि IIIT सारख्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवला. एका अहवालानुसार चार विद्यार्थ्यांना IITमध्ये तर एका विद्यार्थ्याला IIIT नागपूरमध्ये प्रवेश मिळाला. म्हणूनच आशिमा मित्तल यांच्या प्रशासकीय कारकिर्दीत "Super 50' हा फक्त एक सरकारी उपक्रम नसून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा प्रयोग म्हणून ओळखला जाऊ लागला.

"Mission Atmanirbhar'... दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वेगळा प्रयत्न नाशिकमध्ये त्यांच्या कार्यकाळात Mission Atmanirbhar या उपक्रमातून विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा आणि समावेशक शिक्षणावरही भर देण्यात आला. नाशिक जिल्ह्यातील 15 Block Resource Centres अधिक सक्षम करून त्यांना विशेष विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठिकाणांमध्ये रूपांतरित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांच्या कार्यकाळातील शैक्षणिक उपक्रमांमध्ये JEE-NEET Coaching, Mission Atmanirbhar, Spelling Bee आणि Zilla Parishad शाळाचे Digitization यांचा उल्लेख एका वार्षिक अहवालात करण्यात आला आहे.

नाशिकनंतर थेट जालना जिल्हाधिकारी!

नाशिक जिल्हा परिषदेच्या CEO म्हणून सुमारे तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर २०२५ मध्ये त्यांची जालना जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली. नाशिकमधील त्यांच्या कार्यकाळातील शिक्षणविषयक उपक्रमांची राज्यभर चर्चा झाली होती. सध्या त्या जालना जिल्ह्याच्या Collector & District Magistrate म्हणून कार्यरत आहेत, अशी जालना जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंद आहे. जालना महानगरपालिकेच्या नोंदीनुसार त्यांच्याकडे काही काळ महानगरपालिका आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला होता. आणि आता सर्वात मोठी परीक्षा - अंतरवाली सराटी!

IITमध्ये सुवर्णपदक मिळवणंः

UPSCमध्ये देशात १२वा क्रमांक मिळवणंः

आदिवासी भागात प्रशासनाची जबाबदारी सांभाळणं : नाशिकमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांना IIT-NEETच्या दिशेने घेऊन जाणंः

**हे सगळं एका बाजूला :**

आणि आता समोर आहे महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत संवेदनशील विषय मराठा आरक्षण! - मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या प्रतिनिधी म्हणून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन संवाद साधला. उपोषणकर्त्यांची प्रकृती, प्रशासनाची भूमिका आणि शासनाचे निर्णय यांच्यात समतोल साधत संवाद ठेवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त केला तरी आशिमा मित्तल यांनी संवाद सोडला नाही. कारण : प्रशासन म्हणजे फक्त आदेश देणं नाही; कधी कधी समोरच्याचा रागही शांतपणे ऐकून घेणं असतं. आणि म्हणूनच आज अंतरवाली सराटीपासून नाशिकपर्यंत एकच नाव चर्चेत आहे.

IAS **आशिमा मित्तल!** - IITची पदवी, सुवर्णपदक, UPSCमध्ये AIR 12, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी "Super 50' आणि आता जालना जिल्ह्याची प्रशासनाची धुराः ही कहाणी केवळ एका IAS अधिकाऱ्याची नाही; ही 'शिक्षण , प्रशासन , संयम' यांच्या संगमाची कहाणी आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे - ज्या अधिकाऱ्याने ग्रामीण मुलांना IIT पर्यंत पोहोचवण्याचं स्वप्न पाहिलं, आज त्याच अधिकाऱ्यासमोर एका संवेदनशील सामाजिक प्रश्नाचं प्रशासनिक उत्तर शोधण्याची जबाबदारी आहे. आशिमा मित्तल यांची पुढची परीक्षा UPSCची नाहीः ती आहे प्रशासनाच्या कसोटीची खरंच अशिमा मित्तल या महिला अधिकाऱ्याची कथा ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायक आहे.

# मेल्टिंग पॉट फूड प्रॉडक्ट्सने प्रसिद्ध सेलिब्रिटी शेफ हरपाल सिंह सोखी यांची इन्व्हेस्टर आणि ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती; इंचीसाठी रू५००+ कोटींच्या विकासाचे लक्ष्य

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी)- नवी मुंबईस्थित एफएमसीजी कंपनी मेल्टिंग पॉट फूड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडने अधिकृतपणे जाहीर केले आहे की, भारतातील प्रसिद्ध शेफ, पाककला तज्ज्ञ आणि रेस्टॉरेटर शेफ हरपाल सिंह सोखी हे कंपनीसोबत इन्व्हेस्टर आणि ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून जोडले गेले आहेत. ते कंपनीच्या प्रमुख ब्रँड इंची (Inchi)चे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणूनही काम पाहणार आहेत.

२०१७ मध्ये स्थापन झालेल्या आणि निखिल भारती, आर. पी. चटर्जी आणि मनीष पार्डीवाला यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या इंचीने अल्पावधीतच इंडो-चायनीज सेगमेंटमध्ये लोकप्रिय घरगुती ब्रँड म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.

ब्रँडकडे १०० हून अधिक उत्पादनांचा विस्तृत पोर्टफोलिओ आहे. यामध्ये शेजवान डिप आणि स्प्रेड्स, नूडल्स, सॉसेस, गॉरमे आणि इन्स्टंट सूप्स तसेच खास कुकिंग मसाल्यांचा समावेश आहे. या उत्पादनांमुळे घरच्या घरी रेस्टॉरंटसारख्या इंडो-चायनीज पदार्थांची चव सहज अनुभवता येते.

या धोरणात्मक भागीदारीचे महत्त्व अधोरेखित करताना मेल्टिंग पॉट फूड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर निखिल भारती म्हणाले,

उत्पादनांची मोठी आणि ग्राहकांना आवडणारी श्रेणी असलेल्या ब्रँड इंची आणि कंपनीच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आम्ही आता वेगवान विकासासाठी पूर्णपणे सज्ज आहोत. आमच्या उत्पादनांप्रमाणेच सर्व स्तरातील ग्राहकांना आवडणारा आणि इंडो-चायनीज कॅटेगरीवर मनापासून विश्वास ठेवणारा ब्रँड फेस आम्ही शोधत होतो. शेफ हरपाल यासाठी अगदी योग्य व्यक्ती आहेत. त्यांच्या सहभागामुळे आणि धोरणात्मक सहकार्यामुळे पुढील ५ वर्षांत आमचा व्यवसाय रू. ५००+ कोटींपर्यंत नेण्याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

ही हाय-प्रोफाइल भागीदारी केवळ पारंपरिक सेलिब्रिटी एंडोर्समेंटपुरती मर्यादित राहणार नाही. ब्रँडचा चेहरा म्हणून काम करण्यासोबतच शेफ हरपाल हे सक्रिय क्युलिनरी पार्टनर म्हणूनही योगदान देतील. उत्पादनांमध्ये नाविन्य, रेसिपी डेव्हलपमेंट आणि भारतातील घराघरात रेस्टॉरंट-स्टाइल इंडो-चायनीज पदार्थ अधिक सोप्या पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी ते महत्त्वाची भूमिका बजावतील.

आपल्या गुंतवणुकीबाबत आणि भागीदारीबाबत शेफ हरपाल सिंह सोखी म्हणाले, मला हे फक्त आणखी एक एंडोर्समेंट असावे असे वाटत नव्हते. ज्या ब्रँडच्या व्हिजनवर माझा मनापासून विश्वास आहे, अशाच ब्रँडमध्ये मला गुंतवणूक करायची होती. निखिल आणि मेल्टिंग पॉट फूड प्रॉडक्ट्सची टीम आजच्या ग्राहकांना अतिशय चांगल्या प्रकारे समजून घेते. या व्हिजनमध्ये माझा क्युलिनरी अनुभव आणि कौशल्य आणण्याची मला मोठी संधी दिसली. इंडो-चायनीज फूड सेगमेंटमधील आपल्या दीर्घ अनुभवासह शेफ सोखी इंचीला महत्त्वपूर्ण बाजारपेठेची माहिती आणि ग्राहकांचा विश्वास मिळवून देतील. ही भागीदारी इंचीला या कॅटेगरीतील एक प्रमुख ब्रँड म्हणून अधिक मजबूत करण्यासोबतच शेफ सोखी यांच्या वाढत्या उद्योजकीय प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. मेल्टिंग पॉट फूड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि ब्रँड इंचीविषयी...

# सरकारी कर्मचारी-पेन्शनर्ससाठी सप्टेंबर महत्त्वाचा

नवी दिल्ली, दि. ५ (वृत्तसंस्था) - देशातील लाखो केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनर्सचे लक्ष सध्या आठव्या वेतन आयोगाकडे लागले आहे. वेतन, पेन्शन, भत्ते, फिटमेंट फॅक्टर आणि इतर सेवा-सुविधांबाबत आयोगाकडून विविध कर्मचारी संघटना, पेन्शनर्स संघटना आणि संबंधित घटकांशी चर्चा सुरू आहे. सप्टेंबर महिन्यात आयोगाच्या बैठका विविध शहरांमध्ये होणार असून, काही महत्त्वाच्या तारखा कर्मचारी आणि पेन्शनर्ससाठी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

आठव्या केंद्रीय वेतन आयोगाची स्थापना होऊन जवळपास १० महिने झाले आहेत. या काळात आयोगाने देशातील विविध भागांतील कर्मचारी, पेन्शनर्स, संघटना आणि इतर स्टेकहोल्डर्सशी संवाद साधून त्यांच्या मागण्या आणि सूचना जाणून घेतल्या आहेत.

सप्टेंबरमधील महत्त्वाच्या तारखा -

७ आणि ८ सप्टेंबर : चेन्नई बैठक

आठव्या वेतन आयोगाचे पथक ७ आणि ८ सप्टेंबर रोजी चेन्नईला जाणार आहे. १८ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन विनंती आणि आपल्या संघटनेचे मेमोरँडम सादर केलेल्या कर्मचारी-पेन्शनर्स संघटना आणि स्टेकहोल्डर्सना या बैठकीत आपली बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे.

**९ सप्टेंबर : पुडुचेरी बैठक :**

चेन्नईनंतर आयोगाचे पथक ९ सप्टेंबर २०२६ रोजी पुडुचेरीला पोहोचणार आहे. येथेही १८ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अपॉइंटमेंटसाठी अर्ज केलेल्या संघटना आणि स्टेकहोल्डर्सना सहभागी होता येणार आहे.

**१६, १७ आणि १८ सप्टेंबर : चंदीगड बैठक :** यानंतर आयोगाचे पथक चंदीगडचा दौरा करणार आहे. १६ ते १८ सप्टेंबरदरम्यान चंदीगड, पंजाब, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशातील कर्मचारी-पेन्शनर्स संघटना तसेच इतर स्टेकहोल्डर्सशी चर्चा होणार आहे. यासाठी २५ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन विनंती सादर करणे आवश्यक होते.

१८ सप्टेंबर : पुढील बैठकीसाठी अंतिम मुदत : ऑक्टोबरमध्ये कर्नाटकातील बंगळुरू येथे होणाऱ्या बैठकीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कर्मचारी-पेन्शनर्स संघटना आणि स्टेकहोल्डर्ससाठी १८ सप्टेंबर ही महत्त्वाची अंतिम मुदत आहे. या तारखेपर्यंत आठव्या वेतन आयोगाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन विनंती करणे आवश्यक आहे.

ऑक्टोबरमध्ये बंगळुरूमध्ये बैठका :

आठव्या वेतन आयोगाच्या बैठका ऑक्टोबरमध्ये बंगळुरूमध्ये होणार आहेत. ७ आणि ८ ऑक्टोबर २०२६ रोजी बैठका प्रस्तावित आहेत. या बैठकीत सहभागी होण्यासाठी १८ सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन विनंती सादर करावी लागणार आहे. याशिवाय मुंबईमध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांशी आयोगाकडून चर्चा होण्याची शक्यता आहे. मात्र, मुंबईतील बैठकीबाबत अद्याप अधिकृत तारीख जाहीर झालेली नाही.

**पगार आणि पेन्शनमध्ये काय बदल होऊ शकतात?**

या बैठकांमध्ये केंद्रीय कर्मचाऱ्यांची वेतन रचना, नवीन पे मॅट्रिक्स, महागाई भत्ता (DA), महागाई राहत (DR), घरभाडे भत्ता (HRA), प्रमोशन आणि इन्क्रिमेंट यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. कर्मचारी आणि पेन्शनर्स संघटनांकडून मिळणाऱ्या सूचना आयोगाच्या अंतिम शिफारसी तयार करताना महत्त्वाच्या ठरणार आहेत. मात्र, सध्या पगार किंवा पेन्शनमध्ये किती वाढ होईल, याबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही.

## आनंदलहरी भाग-१५८

**तुका म्हणे तोचि संत ।। सोसी जगाचे आघात ।।**

संत कोणाला म्हणावे ? हा प्रश्न अनेकवेळा आपल्यासमोर उभा रहात असतो. हा प्रश्न निर्माण होण्याचे कारण कांही ढोंगी संत होत. ढोंग्यामुळे खरा संत ओळखणे कठीण जाते. स्वत:ला संत म्हणवून घेणाऱ्या काहींनी व्यवहार मांडला आहे. त्यांच्या येण्या-जाण्याची, राहण्याची, खाण्या-पिण्याची व्यवस्था करुनही त्यांना मोठ्या प्रमाणावर मानधन द्यावे लागते आहे. केवळ एवढयावर ही मंडळी समाधानी होत नाही, तर त्यांच्या विविध वस्तू म्हणजे त्यांचे छायाचित्र असणारे बिल्ले, पेन, त्यांच्या हातची माळ, त्यांच्यावर रचलेले किंवा त्यांनी लिहिलेली पुस्तके खरेदी करण्याची किंवा विक्री होण्याची हमीही द्यावी लागते. त्यांच्या सेवेत थोडीसीही कसर झाली तर त्यांचा आगडोंबच होतो. व्यवहार व क्रोधाचे हे चालते-बोलते पुतळे आम्हाला संताची खरी परिभाषा शोधण्यास भाग पाडतात. या मुठभरांच्या चुकीमुळे खऱ्या संतांकडे पाहण्याचा आमचा दृष्टीकोन बदलला जातो आहे, याचे यांना कांहीच वाटत नाही. यांची व्यवस्था करणाऱ्यांचे यांचेकडून खूप कौतुक होते. किर्तन-प्रवचनात हे संयोजकाचे तसेच काही मोठया लोकांचेच पुन्हा-पुन्हा कौतुक करतात, त्यांच्याच नांवाचा उल्लेख करतात. यावेळी यांना संत ज्ञानोबा-तुकाराम आठवतही नाहीत. संतांना ज्या परिक्षा द्याव्या लागल्या त्या परिक्षा हे लोक पावला- पावलाला नापासच होतात. छोटया-मोठया प्रलोभनाला, प्रसिध्दीला हे ढोंगी लोक सहज बळी पडतात. या ढोंग्यांना ढोंगी संत म्हणणे सुध्दा चुकीचे आहे. कारण ढोंगी शब्दाबरोबर संत हा पवित्र शब्द येत आहे. माऊलींनी अशांना तामसी म्हटले आहे. ज्ञानोबा-तुकारामांची, संतांची परिभाषा अशांना समजेल तेव्हा समजेल, आपण तरी संतांची परिभाषा समजून घ्यायला हवी.



तुकाराम महाराजांनी सुंदर उदाहरणाच्या आधारे संतांची परिभाषा करतांना म्हटले आहे, 'हिरा ठेविंता ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं । तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा । मोहरी तोचि अंगे । सूत न जळे ज्याच्या संगें । तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ।' कोणत्याही रंगीबेरंगी काचाच्या तुकडयाला हिरा म्हणत नाहीत. हिरा तोच असतो जो ऐरणीवर ठेवून घणाने घांव घातले तरी तो फुटत नाही. इतर बनावट हिरे मात्र चक्काचुर होतात. ज्याच्या संगतीने सूत जळत नाही, तोच खरा मोहरा असतो. या हिऱ्याप्रमाणे व मोहराप्रमाणे कसलेही आघात झाले, उपद्रव सहन करावे लागले तरी शांतपणाने जो स्थिर राहतो, त्याचबरोबर आपल्या सात्विक विचारापासून अजिबात ढळत नाही, तोच खरा संत होय. स्वार्थ, ईर्षा, मोह, क्रोध, अहंकार, मत्सर, द्वेष अशा शत्रुवर ज्यांनी विजय मिळिवला व अभेद्य अशी समत्व पाहण्याची ज्याला दृष्टी लाभली तोच खरा संत असतो. अशा संतांची समाजाला गरज आहे. अशा संतांची संख्या कमी आहे. ढोंगी लोकामुळे अशा महात्म्यांकडेही लोक साशंक नजरेने पाहतात. आपण ढोंगी लोकांचा पर्दाफाश करण्याचे कार्य केले किंवा ढोंग्यांचा उदो उदो करण्याचे सोडून दिले तर संतांना त्यांचे कार्य करणे सोपे होईल. संतांना मोठेपणा, प्रसिध्दी याचेशी काही देणेघेणे नसते. फक्त लोक चांगले वागावेत असाच त्यांचा प्रयत्न असतो. संत हे निरोगी व आनंदी समाज निर्मितीचा आधारस्तंभ असतात. जय जय राम कृष्ण हरी

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**


# ‘हनुमान अंश’च्या भारतातील शानदार यशानंतर, होम्बले फिल्म्स ११ सप्टेंबरला करणार ग्लोबल रिलीज

नीम करोली बाबांचे दर्शन स्टीव्ह जॉब्स, मार्क झुकरबर्ग आणि ज्युलिया रॉबर्ट्स यांसारख्या दिग्गजांनी घेतले आहे. यासोबतच भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा यांनीही कैंची धामला भेट दिली आहे. हे बाबांशी संबंधित एक पवित्र स्थान असल्याचे सांगितले जाते!

नीम करोली बाबांचे नाव घेताच महावीर हनुमानांची आठवण मनाला स्पर्श करून जाते. अशातच, त्यांची कथा देशातील लोकांना प्रभावित केल्यानंतर आता परदेशातही पोहोचत आहे. नीम करोली बाबा हे तेच संत आहेत, ज्यांच्या आध्यात्मिक प्रभावाने स्टीव्ह जॉब्स, मार्क झुकरबर्ग आणि ज्युलिया रॉबर्ट्स यांसारख्या मोठ्या व्यक्तींनाही प्रभावित केले आहे.

भारतीय चित्रपटगृहांमध्ये शानदार कामगिरी केल्यानंतर, हिंदी डिवोशनल ड्रामा चित्रपट ‘हनुमान अंश’ आता आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाला आहे. अशातच, या चित्रपटाच्या इंटरनॅशनल डिस्ट्रीब्युशनची जबाबदारी होम्बले फिल्म्सने घेतली आहे. हा चित्रपट ११ सप्टेंबर २०२६ रोजी ग्लोबल स्तरावर रिलीज होण्यासाठी सज्ज आहे.

‘हनुमान अंश’ची कथा नीम करोली बाबांच्या जीवनावर आधारित असून, ती विशाल चतुर्वेदी यांनी लिहिली आणि दिग्दर्शित केली आहे. भक्तांकडून भगवान हनुमानांचा अवतार मानले जाणारे बाबा ‘महाराज-जी’ या नावानेही ओळखले जातात. बाबांना त्यांच्या भक्तीबरोबरच प्रेम आणि सेवेच्या शिकवणीसाठीही भक्त ओळखतात. हे जाणून तुम्हाला आश्चर्य वाटेल की, बाबांचा प्रभाव भारतापेक्षा पाश्चिमात्य देशांमध्ये अधिक पाहायला मिळाला आहे, विशेषतः १९६० आणि १९७० च्या दशकात, जेव्हा अनेक




साधक त्यांच्या दर्शनासाठी भारतात आले होते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर ‘हनुमान अंश’च्या डिस्ट्रीब्युशनची घोषणा करताना, होम्बले फिल्म्सने आपल्या सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लिहिले आहे -

‘विश्वासावर विणलेली एक कथा. सीमांच्या पलीकडे एक प्रवास.

आम्ही, @hombalefilms, Ho$mbaleOverseas च्या माध्यमातून #H$anumanAnsh ला इंटरनॅशनल ऑडियन्सपर्यंत पोहोचवताना अभिमान वाटत आहे.

आता महाराज-जींचा भक्तिमय प्रवास जगभर पोहोचणार आहे, कारण ऽ हरपींरपरपीह फिल्म ११ सप्टेंबर २०२६ रोजी जगभरात रिलीज होत आहे.‘

‘हनुमान अंश’ हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये चांगली कामगिरी करत आहे. रिपोर्टनुसार, चित्रपटाने अवघ्या १० लाखांच्या ओपनिंगनंतर चांगली गती पकडली आहे आणि पाहता पाहता बॉक्स ऑफिसवर २६व्या दिवसापर्यंत ₹63.82 कोटींचा आकडा आपल्या नावावर केला आहे. चित्रपटाच्या चांगल्या कथेला जबरदस्त वर्ड-ऑफ-माउथचा फायदा झाला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये हा चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढताना दिसत आहे. बाबांचे भक्त देशापासून परदेशापर्यंत आहेत. भक्तांमध्ये जगातील काही सर्वात प्रभावशाली व्यक्तींचाही समावेश आहे, ज्यामध्ये स्टीव्ह जॉब्स, मार्क झुकरबर्ग आणि ज्युलिया रॉबर्ट्स यांसारख्या दिग्गजांची नावे आहेत. तर भारतात भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली आणि त्यांची पत्नी अभिनेत्री अनुष्का शर्मा यांनीही कैंची धाम बाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी येथे भेट दिली आहे.

१९७४ मध्ये स्टीव्ह जॉब्स महाराज-जींचा शोध घेण्यासाठी भारतात आले होते. त्यानंतर स्टीव्ह जॉब्स यांच्या सांगण्यावरून एका कठीण काळात मार्क झुकरबर्ग यांनीही कैंची धामला भेट दिली होती. याशिवाय, ज्युलिया रॉबर्ट्स यांनीही त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाबद्दल मोकळेपणाने बोलताना नीम करोली बाबांच्या नावाचा आणि त्यांच्या प्रभावाचा उल्लेख केला होता.

होम्बले फिल्म्स ‘हनुमान अंश’ची कथा केवळ ग्लोबल मार्केटमध्ये घेऊन जात नाही, तर अशा संताची कथा परदेशात पोहोचवण्याचे काम करत आहे, ज्यांचा प्रभाव देशाच्या सीमांपलीकडेही होता. म्हणावे लागेल की, हा चित्रपट प्रत्येकासाठी एक वेगळा अनुभव ठरणार आहे आणि यासोबत जगभरातील आणखी प्रेक्षक भक्त म्हणून जोडले जाणार आहेत.

या भक्तिमय चित्रपटासोबत कैंची धाम पासून जगभरातील प्रेक्षकांपर्यंत महाराज-जींची कथा आता देशापासून परदेशातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाली आहे. हा चित्रपट ११ सप्टेंबर २०२६ रोजी जगभरात रिलीज होणार आहे.

होम्बले फिल्म्सबद्दल बोलायचे झाल्यास, हे भारतातील सर्वात मोठ्या प्रोडक्शन हाऊसेसपैकी एक आहे. या प्रोडक्शन हाऊसने पॅन इंडिया स्तरावर केवळ KG$F$ फ्रँचायझी, ‘कांतारा’, ‘सालार’ फ्रँचायझी आणि ‘महावतार नरसिंहा’ यांसारख्या ब्लॉकबस्टर फ्रँचायझी दिल्या नाहीत, तर आपल्या नव्या आणि अनोख्या प्रकारच्या चित्रपटांद्वारे प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासोबतच त्यांना आपल्या मुळांशीही जोडले आहे. होम्बले फिल्म्सने बॉक्स ऑफिसवरील कमाईच्या बाबतीतही आपली ताकद दाखवली आहे.

होम्बले फिल्म्सने ‘महावतार नरसिंहा’सोबत भारतातील सर्वोत्तम ॲनिमेटेड चित्रपटांपैकी एक दिला आहे. या चित्रपटासोबत निर्मात्यांनी देशातील ॲनिमेशनच्या कक्षेला एका नव्या स्तरावर नेले आहे, तसेच आपल्या सांस्कृतिक मुळांचाही त्यात समावेश केला आहे. अशातच, प्रत्येक बदलत्या काळासोबत कंपनीने तेलुगू आणि मल्याळम सिनेमासह भारतातील अनेक फिल्म इंडस्ट्रीजमध्येही आपल्या विस्ताराचा आवाका वाढवला आहे. आगामी चित्रपटांबद्दल बोलायचे झाल्यास, या प्रोडक्शन हाऊसकडे जबरदस्त लाइन-अप आहे. यामध्ये ‘सालार: भाग २ - शौर्यांग पर्व’, ‘महावतार परशुराम’, ‘सूर्या ४८’, ‘येतो का नाय’ आणि हृतिक रोशनसोबत येणाऱ्या आगामी चित्रपटाचा समावेश आहे.

# विवाह संबंधातील पावित्र्य आणि गांभीर्य

विवाह संबंधाचा इतिहास लक्षात घेता समाज सुधारणा आणि समाजाची वृद्धी या अंगाने देखील त्याकडे बघता येते. विवाहाच्या निमित्ताने दोन कुटुंबियांचे आपसात चांगले संबंध प्रस्थापित होतात. या दोन कुटुंबामुळे त्यांच्याशी संबंधित अन्य कुटुंब ही एकमेकांशी परिचित होतात, परिचयातून संबंध वाढतात, समाज एकजीवसी होण्यासाठी त्याची मदत होते. वंशपरंपरांचा विचार करता त्यातही विवाह बंधनाला पवित्र बंधन असे मानले गेले आहे. त्यातून वंशवृद्धी अपेक्षित असते, विवाहा नंतर पुत्र किंवा कन्याप्राप्तीमुळे वंश विस्तार होतो आणि समाज सुदृढ होण्यासाठी मदत होते. मानवी इतिहासाचा मागोवा घेतला असता, वेगवेगळ्या पद्धतीने विवाहाची पद्धत परंपरेने चालत आलेली आहे असे दिसून येते.

राजे राजवाड्यां कडील स्वयंवराची पद्धत, परस्पर संमतीने होणारे गांधर्व विवाह, आणि युद्ध करून राजकन्येला जिंकून तिच्याशी होणारा विवाह या विवाहाच्या विविध पुरातन परंपरा इतिहासात होत्या. विवाहाचे अन्य प्रकारही त्या काळात अस्तित्वात होते. अलीकडच्या दोन तीनशे वर्षात यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाला.

इंग्रजांच्या दीडशे वर्षाच्या राज्यामुळे विवाह परंपरा आणि संस्कारांवर त्यांच्या रूढी आणि परंपरेचा काही ना काही परिणाम निश्चित झाला. देशाला मिळालेल्या स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचे महत्त्व सर्वांना समजले. शिक्षणाच्या संधी सर्वांना मिळाव्यात यासाठी शासकीय पातळीवर गंभीरपणे प्रयत्न झाले आणि त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले. शिक्षणामुळे समाजात प्रगल्भता आली, परस्परांना समजून घेण्याची क्षमता वाढली, आणि विवाह संबंधातील पावित्र्य आणि गांभीर्य समजण्यास मदत झाली.

साधारण पंधरा वर्षांपूर्वी पालकांच्या संमतीने विवाह ही रूढ परंपरा होती. मुलगा, मुलगी विवाह योग्य वयात आल्यावर त्यांच्यासाठी इष्ट वधू, वर शोधण्यासाठी परिचित, नातेवाईकांत शोध घेतला जात असे. प्राथमिक चौकशीनंतर सर्व ठाक ठीक असल्यास मुलगी पाहण्याचा अधिकृत कार्यक्रम होत असे आणि संमती नंतर व्यवहारिक गोष्टींची चर्चा होऊन विवाह निश्चिती होत असे. पालकांनी ठरवलेल्या संबंधाबद्दल फारशी तक्रार नसे.

विवाहविधी हा मांगल्याचे प्रतीक समजला जात होता, आणि वधू-वर पक्षाच्या परस्पर सामंजस्यातून उभय पक्षाच्या जवळचे निवडक परिचित नातेवाईक यांचे सह शक्यतो घरासमोर मंडप टाकून विवाह संपन्न करण्याची पद्धत होती. थोडी फार तडजोडीची तयारी असल्यास या काळात सहजपणे विवाह ठरत असत आणि संपन्न ही होत असत. मागील काही वर्षात विशेषतः १९९० च्या जागतिकीकरणानंतर देशात, परदेशात नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणावर वाढल्या. संगणकीकरणाचे युग आल्यामुळे पूर्वी कधीही कल्पना केली नव्हती एवढी पगाराची पॅकेजेस मिळू लागली आणि तिथूनच विवाह ही एक मोठी समस्या होण्यास सुरुवात झाली. मुला, मुलींचे उत्पन्न पूर्वी कधीही कल्पना केली नव्हती इतके वाढले. विचारसरणीतील दोषामुळे मुलींना याही काळात आपल्यापेक्षा अधिक उत्पन्न मिळवणारा पती असावा, अशा अपेक्षेमुळे विवाह जमणे अधिक अवघड झाले. एकट्याने देशात, परदेशात नोकरीच्या निमित्ताने राहणे ही एक अपरिहार्य बाब असल्यामुळे स्वतःची मते तयार झाली. स्वतःच्या स्वतंत्र आणि मोठ्या अपेक्षा या विवाह जुळण्यासाठी मोठा अडसर ठरू लागल्या. मुलींची संख्या मुळातच कमी असल्यामुळे हा विषय आणखी गंभीर झाला.

अलीकडच्या दहा वर्षात मुलीच्या विवाहाच्या बद्दलची बोलणी वडिलांकडून आईकडे शिफ्ट झाली आहेत. अगदी प्राथमिक माहिती पासून ते विवाह जुळल्यास अटी पर्यंत मुलीच्या आईचे मत हीच दगडावरची रेष ठरू लागली आहे, परिणामी ३५ आणि ४० वर्ष वय होऊनही लग्न जुळणे अवघड झाले आहे. सध्यः स्थितीत मुलीचे पारडे जड आहे. सर्व मुलींना पुणे, मुंबई, बंगलोर, किंवा परदेशातली मुले लग्नासाठी हवी आहेत. विदर्भ, मराठवाडा येथील तालुका आणि जिल्ह्यातल्या मुलांची स्थिती अत्यंत केविलवाणी आहे. उत्तम शिक्षण, चांगला पगार असूनही त्यांच्या गावात नोकरी असल्यामुळे त्यांना विवाहयोग्य मुलगी मिळणे जवळजवळ दुरापास्त झाले आहे.

**मुलींच्या अपेक्षा बाबत विवेक :** लग्न जुळवण्यासाठी तडजोडीची आवश्यकता आहे आणि असते. अपेक्षांच्या बाबतीत मुलींनी आणि त्यांच्या आईने विवेक ठेवण्याची गरज आहे. साध्या पदवीधर असलेल्या मुलींनी पुणे, मुंबई किंवा परदेशातील जास्त पगाराच्या स्थळाचे अपेक्षा ठेवणे हे रास्त नाही. या प्रकारची मुलांची स्थळे मर्यादित प्रमाणात असतात याचाही विचार करणे आवश्यक आहे. भारताच्या प्रगतीचा विचार करता सध्या सर्व मध्यम प्रकारच्या शहरांमधून शिक्षणासह सर्व सोयी उपलब्ध आहेत. वाहतुकीच्या सोयी आहेत, निवास, डॉक्टरांच्या सुविधा या सर्व बाबी आता सर्व देशभरामध्ये सहजपणे उपलब्ध आहेत हे वास्तव स्वीकारणे आवश्यक आहे. पुणे, मुंबई, बंगलोर मध्ये प्रचंड गर्दी झालेली असून धक्काधक्कीचे जीवन जगावे लागते ही वस्तुस्थिती आहे. या सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार करून विवाहासाठी काही प्रमाणात तरी तडजोडीची तयारी ठेवल्यास विवाह निश्चितपणे जुळू शकतात. आपल्या अटींमध्ये ताठरपणा असल्यास त्याचा व्यक्तिगत जीवनावर दुष्परिणाम होऊ शकतो आणि पर्यवसान लग्न न जुळण्यातही होऊ शकते.

शिकल्यामुळे प्रगल्भता येते, वाचनामुळे ती वाढते याचा विचार करून विवाहाच्या बाबतीत मुलींनी आणि त्यांच्या आईने याबाबतीत सामंजस्याचे धोरण ठेवल्यास हा प्रश्न सुटण्यास निश्चित मदत होईल. तडजोड ही समाजाची गरज आहे हे सर्वांनीच समजणे आवश्यक आहे. या बाबतीत गंभीरपणे विचार करून तडजोडीची तयारी ठेवल्यास सध्या उदयास आलेले वधू वर सूचक मंडळ यांचे मार्फत विवाह निश्चितपणे जुळू शकतील अशी खात्री वाटते. वधू वर सूचक मंडळ ही लग्न जमवण्यासाठी उत्तम मध्यस्थ असून सर्व प्रकारची चौकशी करून चांगल्या स्थळांची शिफारसच ते करतात. या सेवांचा लाभ घेऊन, मात्र तडजोडीची तयारी ठेवून विचार केल्यास विवाह ही समस्या राहणार नाही.

**- डॉ. अभय मंडलिक**

- लेखक निवृत्त बँकर असून सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक आहेत

# रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल स्टारर ‘लव्ह अँड वॉर’चे शूटिंग पूर्ण; २१ जानेवारी २०२७ रोजी भन्साळींचा ग्रँड सिनेमा येणार!

‘लव्ह अँड वॉर’चे शूटिंग पूर्ण! रणबीर-आलिया-विकीसह संजय लीला भन्साळींची बहुप्रतीक्षित फिल्म २१ जानेवारीला होणार रिलीज. भारतीय फिल्म इंडस्ट्रीतील सर्वात मोठ्या आणि व्हिजनरी फिल्ममेकर्सपैकी एक असलेले संजय लीला भन्साळी येत्या वर्षात आपल्या चाहत्यांचे मनोरंजन करण्यासाठी त्यांच्या बहुप्रतीक्षित ‘लव्ह अँड वॉर’ या चित्रपटाच्या रिलीजसह सज्ज झाले आहेत. या चित्रपटात रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल यांसारखे प्रतिभावान कलाकार एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत. हा चित्रपट एक ग्रँड रोमँटिक वॉर ड्रामा असून या तिघांना एकत्र पाहणे खरोखरच खास ठरणार आहे. नेहमीच आपल्या अनोख्या भव्य शैलीत आणि अप्रतिम व्हिज्युअल्सच्या माध्यमातून शानदार कथा सादरण्यासाठी ओळखले जाणारे संजय लीला भन्साळी यांच्याकडून यावेळीही




देश-विदेशातील प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत आणि ते यावेळीही काहीतरी जबरदस्त घेऊन येत असल्याची उत्सुकता आहे. प्रेक्षकांमध्ये चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढत असतानाच एक नवे अपडेट समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संजय लीला भन्साळींनी चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले आहे. आता शूटिंग पूर्ण झाल्यानंतर संजय लीला भन्साळी यांचे संपूर्ण लक्ष चित्रपटाच्या पोस्ट-प्रोडक्शनच्या कामावर असणार आहे.

यात कोणतीही दोन मते नाहीत की संजय लीला भन्साळींचा ‘लव्ह अँड वॉर’ हा २०२७ मधील सर्वाधिक प्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. त्यामुळे हे अपडेट प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवणारे आहे.

मात्र, आतापर्यंत प्रेक्षकांना चित्रपटाची एक झलकदेखील पाहायला मिळालेली नाही. त्यामुळे अखेर हा चित्रपट नेमका कसा असणार आहे, याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. चित्रपटाच्या रिलीजच्या वेळी थिएटर्समध्ये मोठी गर्दी पाहायला मिळण्याची अपेक्षा आहे, कारण निर्मात्यांनी रिलीजसाठी प्रजासत्ताक दिनाच्या आसपासचा कालावधी निवडला आहे. सांगायचे झाले तर, हा चित्रपट २१ जानेवारी २०२७ रोजी सिनेमागृहात दाखल होणार आहे. कथा सांगण्याच्या आपल्या वेगळ्या दृष्टिकोनासाठी प्रसिद्ध असलेल्या संजय लीला भन्साळी यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेल्या ‘लव्ह अँड वॉर’कडून मोठ्या अपेक्षा आहेत. इंडस्ट्रीतील तीन अत्यंत प्रतिभावान आणि व्हर्सटाइल कलाकारांचा भन्साळींच्या उत्कृष्ट दिग्दर्शन क्षमतेसोबत एकत्र येणे हीच या चित्रपटाला सर्वाधिक खास बनवणारी गोष्ट आहे.

मोठ्या स्केलवर तयार होत असलेल्या या चित्रपटात रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. ‘लव्ह अँड वॉर’ हा चित्रपट २१ जानेवारी २०२७ रोजी जगभरातील सिनेमागृहांमध्ये रिलीज होणार आहे. हा चित्रपट हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे.

# नाशिकच्या द्राक्षांची सातासमुद्रापार झेप! शेतमालाची निर्यात २७ हजार कोटींवर

नाशिक, दि. ५ (प्रतिनिधी) - नाशिकच्या शेतमालाला आता जगभरातील बाजारपेठांची दारे अधिक खुली होत आहेत. जिल्ह्याची २०२५-२६ मधील निर्यात २७हजार ३२५ कोटी रुपयांवर पोहोचली असून, वर्षभरात १२.४६ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. विशेष म्हणजे, हजारो द्राक्ष उत्पादक निर्यातसाखळीत सहभागी झाल्याने नाशिकच्या शेतीला जागतिक बाजारपेठेची जोड मिळत आहे.मात्र, वाढत्या निर्यातीचा प्रत्यक्ष फायदा शेतकऱ्यांच्या खिशात किती पाहोचतो, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा ठरत आहे.



द्राक्ष बाजारात नाशिकचे वर्चस्व कायम

नाशिक विभागाची निर्यात ३१ हजार ६४१ कोटींवरून ३५ हजार ३२१ कोटी रुपयांवर पोहोचली असून, त्यात नाशिक जिल्ह्याचा तब्बल ७७.४ टक्के वाटा आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्राच्या निर्यात नकाशावर नाशिकचे वर्चस्व कायम आहे. २०२३-२४च्या हंगामात नाशिक जिल्ह्यात २८ हजारांहून अधिक द्राक्ष उत्पादकांनी सुमारे १८ हजार ६०० हेक्टर क्षेत्राची निर्यात नोंदणी केली होती. याच हंगामात जिल्ह्यातून १.५७ लाख टन द्राक्षांची निर्यात झाली. यापैकी १.१८ लाख टन द्राक्षे युरोपीय देशांत, तर सुमारे ३९ हजार टन द्राक्षे अन्य देशांत गेली. त्यामुळे निर्यातसाखळी मोठ्या संख्येने द्राक्ष उत्पादकांपर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट होते. निर्यात वाढल्याने शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठेपलीकडे मोठ्या ग्राहकवर्गापर्यंत पोहोचण्याची संधी मिळते. दर्जेदार व निर्यातक्षम द्राक्षांना मागणी असताना उत्पादकांना तुलनेने चांगला भाव मिळू शकतो. २०२५ मधील वृत्तानुसार, निर्यातक्षम द्राक्षांना प्रतिकिलो ७५ ते ११० रुपयांपर्यंत दर मिळाल्याची नोंद आहे.

**कांदा-द्राक्षांपलीकडे निर्यातीचा विस्तार -** नाशिकची निर्यात आता कांदा-द्राक्षांपुरती मर्यादित राहिलेली नाही. अभियांत्रिकी वस्तू, वाहनांचे सुटे भाग, इलेक्ट्रॉनिक्स, प्लास्टिक, प्रक्रिया अन्न, वस्त्रोद्योग आणि औषधनिर्मिती क्षेत्रांचा ही वाटा वाढत आहे. परिणामी पॅकहाऊस कोल्डचेन , वाहतूक, प्रक्रिया उद्योगआणि निर्यात सेवांमध्ये रोजगार व व्यवसायाच्या नव्या संधी निर्माण होत आहेत.

# महात्मा फुलेंच्या विचारांची प्रेरणा घेत महिलांचा निबंधलेखनातून जागर

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी निमित्त समर्थनगर येथील प्रौढ महिला विद्यालयात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थिनींसाठी महापुरुषांच्या जीवनावर आधारित निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींना गुरुवार (ता. ३) रोजी आयोजित छोटेखानी कार्यक्रमात रोख पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

प्रत्येक वर्गातून प्रथम क्रमांक मिळिवणाऱ्या विद्यार्थिनीला १६१ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १३१ रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी १११ रुपये असे रोख पारितोषिक देण्यात आले. महापुरुषांच्या विचारांचा आणि कार्याचा अभ्यास करून ते आपल्या शब्दांत मांडण्याची संधी या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मिळाली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती विमल रंधे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सौ. कुसुम डांबरे उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनींना रोख पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

**प्रौढ महिलांसाठी शिक्षणाची नवी संधी -** समर्थनगर येथील प्रौढ महिला विद्यालयाचे वैशिष्ट्य म्हणजे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या प्रौढ महिलांनाही पुन्हा शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

ज्या महिलांना पूर्वी शिक्षण घेता आले नाही, अशा महिलांना थेट चौथीच्या वर्गात प्रवेश देऊन पुढील शिक्षणाची दारे खुली केली जातात.

## प्रौढ महिला विद्यालयात महापुरुषांच्या जीवनावर निबंध स्पर्धा; विजेत्या महिलांना रोख पारितोषिकांचे वितरण

या विद्यालयात प्रवेशासाठी किमान १५ ते कमाल ६५ वर्षे अशी वयोमर्यादा आहे. त्यामुळे शिक्षणाची इच्छा असूनही वयामुळे शिक्षणापासून दूर राहिलेल्या महिलांना पुन्हा शाळेत येण्याची संधी मिळत आहे.

महिला शिक्षित झाल्यास केवळ तिचे आयुष्य बदलत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या विचारांना आणि पुढील पिढीच्या भविष्याला दिशा मिळते. त्यामुळे अशा प्रौढ महिला विद्यालयांचे कार्य सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे.

शिक्षक-शिक्षिकांचे मोलाचे सहकार्य

निबंधलेखन स्पर्धेच्या आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिकांचे सहकार्य लाभले. महापुरुषांच्या जीवनकार्याचा अभ्यास, लेखनाची आवड आणि सामाजिक जाणीव विद्यार्थिनींमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# झोपेशी संबंधित आधुनिक संशोधन व उपचारपद्धतींची माहिती आत्मसात करा-अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचे आवाहन

## घाटीत डिकोडिंग स्लीप विषयावर कार्यशाळा, १३० डॉक्टरांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी) - आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकजण धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. यादरम्यान योग्य आहारविहार आणि पुरेशी झोप होत नसल्याने अनेक व्याधी जडतात. निरोगी जीवनशैलीमध्ये पुरेशी व गुणवत्तापूर्ण झोप अत्यंत महत्त्वाची असून, झोपेचे विकार ओळखून योग्यवेळी निदान व उपचार करणे आवश्यक आह. वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांसह डॉक्टरांनी झोपेशी संबंधित आधुनिक संशोधन व उपचारपद्धतींची माहिती आत्मसात करण्याचे आवाहन घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी केले.



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शरीरक्रियाशास्त्र विभागाच्या वतीने डिकोडिंग स्लीप विषयावर सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण कार्यक्रम (सीएमई) आयोजित करण्यात आला. या सीएमईचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमात झोपेचे शरीरविज्ञान, झोपेची आवश्यकता, सर्केडियन रिदम आणि झोप-जागृतीचक्र यांसह झोपेशी संबंधित विविध विकारांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. शरीरक्रियाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली शेटे, डॉ. तृप्ती बोरुळकर, डॉ. श्रीकांत पापीनवार, डॉ. अतुल पोरे, डॉ. रितेश भाग्यवंत, डॉ. प्रदीप देशमुख, डॉ मंगलमुर्ती चौधरी आदींनी तज्ञांनी या विषयावर सखोल व सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रामासाठी जवळपास १३० डॉक्टरांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पॉलिसॉम्नोग्राफी, विविध पीएपी मशीन आणि इंटरफेसेस यावर कार्यशाळा घेण्यात आली. डॉ. श्रीकांत पापीनवार व त्यांच्या टीमने या कार्यशाळेचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमुळे झोपेचे महत्त्व, झोपेचे विकार, त्यांचे निदान तसेच आधुनिक उपचारपद्धती याबाबत वैद्यकीय क्षेत्रातील सहभागींच्या ज्ञानात भर पडली. या कार्यक्रमासाठी उपअधिष्ठाता डॉ. विनोद मुदंडा, वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुरेश हरबडे, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे निरीक्षक डॉ. मनीष मालानी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे आयोजन विभागातील आर्गनायझिग सेक्रेटरी डॉ. नंदा सोमवंशी व उपाधिष्ठाता डॉ. काशीनाथ गर्कळ तसेच या कार्यक्रमाला डॉ. सुरवसे, डॉ. डांगे, डॉ. अश्फाक, डॉ. मुनीब, डॉ. रूपा व इतर अध्यापक तसेच पदव्युतर विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पाडण्यासाठी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. स्मिता बुटे यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. प्रतिभा कलवले यांनी केले.

# वैजापूर शहर व तालुक्यात विविध शैक्षणिक संस्था शाळा महाविद्यालयात शिक्षकदिन उत्साहात



वैजापूर दि.५ (प्रतिनिधी)- भारताचे शिक्षक राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिन शिक्षक दिन म्हणून वैजापूर शहर व तालुक्यात शाळा, महाविद्यालयात विविध उपक्रम आयोजित करून शनिवार(ता.०५)रोजी उत्साहात संपन्न झाला.येथील कैलास पाटील माध्यमिक विद्यालय व छत्रपती इंटरनॅशनल इंग्लिश माध्यमाच्या शाळेत तसेच श्रीमती सुशीलाबाई कदम अध्यापक विद्यालयात शिक्षणाचे महत्व विशद करणारे कार्यक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी शिक्षणाधिकारी व मराठवाड्याचे जेष्ठ कवी धोंडीरामसिंह राजपूत यांची उपस्थिती होती ,त्यांनी राष्ट्र वैभव असलेल्या शिक्षकांना आपले कर्तव्य निष्ठापूर्वक करण्याचे आवाहन करुन डॉ. राधाकृष्णन यांचा वैभव डोळ्यासमोर ठेवण्याचे आवाहन केले. त्यांचो इयत्ता पांचवीला असलेली ''बैल पोळा''कविता त्यांनी शिकविली.आरंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. कविता ही सादर झाल्या, काहींनी शिक्षण महत्व व्यक्त करणारी नाटिका सादर केली.

या प्रसंगी कैलास पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक एन.एस.कदम, पर्यवेक्षक श्रीमती कदम,प्रशासकीय अधिकारी व्ही.एस. कदम,छत्रपती इंटरनॅशनल शाळेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुषमा कदम, श्रीमती सुशीलाबाई कदम अध्यापक विद्यालय प्राचार्य श्री .ठोसर,तसेच शिक्षक सर्वश्री त्रिभुवन, देवरे,सागर मापारी, विशाल मोरे,नैना वर्मा,रुपाली पवार,सुस्मिता मापारी, श्रीमती चव्हाण,मिसाळ, हर्षदा मॅडम, श्रीमती महरिन,श्रीमती घेर,निलकमल पवार,शुभांगी बनकर,मनाली श्रीवास्तव अंभोरे एन. बी.यांनी सहभाग नोंदवला. काही विद्यालयात विद्यार्थ्यांनी शिक्षकी भूमिका करुन वर्गात अध्ययन -अध्यापन केले.शिक्षकाना फुल देऊन त्याचा गौरव ही करण्यात आला.

# आकडे टाकून, मीटरमध्ये फेरफार करत वीजचोरी; चिकलठाणा परिसरातील १६ जणांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- वीजबिल थकबाकीसाठी महावितरणने वीजपुरवठा खंडित केलेला असतानाही अनधिकृतपणे वीज वापर करणाऱ्या चिकलठाणा परिसरातील १६ इसमांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले.

महावितरणच्या महावितरणच्या चिकलठाणा उपविभागातील वसुली पथकाचे सहायक अभियंता ज्ञानोबा राठोड यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कार्यक्षेत्रात अनधिकृत वीजवापराविरोधात मोहीम राबवली. यात काही ग्राहक थकबाकीसाठी वीजपुरवठा खंडित असतानाही आकडे टाकून व मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करताना आढळले. यात गट नं. २५५, सावित्रीनगर येथील अंकुश रंगनाथ दहिहंडे याने २७ हजार ९८०, गणेश रंगनाथ दहिहंडे याने ३० हजार १३०, वैजीनाथ रंगनाथ दहिहंडे याने २८ हजार २१०, साईनाथ दिगंबर दहिहंडे याने २४ हजार ८०, भगिनाथ मनोहर दहिहंडे याने २९ हजार ६०, जयाजी नारायण दहिहंडे याने २८ हजार ५१०, गंगाधर मनोहर दहिहंडे याने २७ हजार ९८०, बालाजी हायस्कूलजवळील दहिहंडे गल्लीतील भाऊसाहेब भानुदासराव दहिहंडे याने ८ हजार ५००, हीनानगरमधील गट नं. २७३, प्लॉट नं. २१ येथील कमला सुचासिंग गिल हिने १८ हजार ७१०, न्यू कचरा पट्टीतील गट नं. २३२ येथील हमीद खान अहेमद खान याने १८ हजार ४६०, चिकलठाणा येथील कैलास नागोराव क्षीरसागर याने २१६०, सावित्रीनगरच्या प्लॉट नं. ६९ येथील निर्मलाबाई सुभाष मगरे हिने ९८०, दानिश पार्क, नारेगाव प्लॉट नं. ६१, गट नं. ५ येथील इम्तियाज अहमद एम. डी. मुस्तकीम याने २ लाख ८ हजार ३०, पटेल नगर, नारेगाव गल्ली नं. ७ येथील फिरोज जाबीर शहा याने ५६ हजार ९५०, पटेल नगर, नारेगाव गल्ली नं. ३ मधील अझहर हुसेन पटेल याने ३९ हजार २९० व नं. २५/पार्ट, गट नं. ५, कुरेशी पार्क येथील यास्मिनबी जुनेद पटेल हिने ८५ हजार १६० रुपयांची वीजचोरी केली.

या सर्व वीजचोरांनी महावितरणचे कंपनीचे ६ लाख ३४ हजार १९० रुपयांचे नुकसान केले. सहायक अभियंता ज्ञानोबा राठोड यांच्या फिर्यादीवरून १६ आरोपींवर भारतीय विद्युत कायद्याच्या कलम १३५ नुसार सिडको पोलिस ठाण्यात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

# पवना धरणाच्या जलपुजनाद्वारे पाण्याच्या योग्य वापराचा संदेश

पुणे दि.५ (प्रतिनिधी)- पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पारंपरिक पद्धतीने जलपूजन करण्यात आले. शुक्रवार दि. ४ रोजी महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात जलपूजन करून जलदेवतेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी शहराला वर्षभर पुरेसा, नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली.

पवना धरण हे पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाचे जलस्रोत आहे. यंदा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने समाधानकारक परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जलपूजनाच्या माध्यमातून जलस्रोतांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच पाण्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला.

जलपूजनाच्या निमित्ताने जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, नदीपात्रा नजिकची स्वच्छता करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची गरज असल्याने उपलब्ध जलसाठ्याचे जतन करणे आणि त्याचा योग्य वापर करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता भविष्यातील पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी जलस्रोतांचे नियोजनबद्ध संवर्धन, पाण्याची बचत आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर यावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून नागरिकांनीही पाणी बचतीच्या सवयी



अंगीकाराव्यात, असे आवाहन करण्यात आले. यावेळी महापौर रवी लांडगे यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, जलसंपदा विभागाचे रजनीश भारिया, प्रसिद्धी अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

# ४५८ अकृत्रिम जिनालयांची पूजा... ५० वर्षांपूर्वी आर्यिका ज्ञानमती माताजींनी रचलेले इंद्रध्वज विधान यंदा स्वर्णिम वर्षात

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- जैन धर्मातील अत्यंत भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक अनुष्ठान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंद्रध्वज विधानाचे आयोजन आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर येथे २ ते ९ सप्टेंबरदरम्यान करण्यात आले आहे. सिद्धांत चक्रवर्ती आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांच्या मंगल सान्निध्यात, प्रेरणा व मार्गदर्शनाखाली हे विधान होत आहे. यंदा इंद्रध्वज विधानाच्या रचनेला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने देशभरात हे स्वर्णिम वर्ष म्हणून विविध धार्मिक उपक्रमांद्वारे साजरे केले जात आहे.

इंद्रध्वज विधानाच्या निमित्ताने आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांनी प्रवचनातून उपस्थित भाविकांना धर्माच्या खऱ्या स्वरूपाची जाणीव करून दिली. ते म्हणाले, ''देवाची पूजा करताना आपण देवत्वाकडे पाहतो; परंतु त्या देवत्वाचा अंश आपल्या जीवनात उतरविणे हेच धर्माचे खरे प्रयोजन आहे. मंदिरात जाऊन अभिषेक करणे सोपे आहे, पण मनातील क्रोध, मान, माया आणि लोभ यांचा अभिषेक करून त्यांना दूर करणे ही खरी साधना आहे.''

ते पुढे म्हणाले, ''इंद्रध्वज विधानात आपण ४५८ अकृत्रिम जिनालयांचे पूजन करतो. ही केवळ मंदिरांची संख्या नाही, तर आपल्या श्रद्धेची व्याप्ती आहे. प्रत्येक जिनालय आपल्याला सांगते की आत्म्याचा मार्ग बाहेर नसून आपल्या अंतरंगात आहे. ध्वज आकाशात उंच जातो, त्याचप्रमाणे आपल्या जीवनातील विचारही उंच झाले पाहिजेत.'' ''धर्माचा उपयोग केवळ सुख मागण्यासाठी करू नका; धर्म आपल्याला सुख-दुःखाच्या पलीकडे जाण्याची शक्ती देतो. परिस्थिती बदलण्यापेक्षा स्वतःचे मन बदलले, तर जीवन बदलते. म्हणून विधानातील प्रत्येक मंत्र, प्रत्येक पूजा आणि प्रत्येक धार्मिक विधी हा आत्मचिंतनाचा क्षण समजून करा,'' असे आवाहन आचार्य श्रींनी केले.

आचार्य श्रींनी अहिंसा, संयम, त्याग आणि आत्मशुद्धी यांचे महत्त्व सांगताना भाविकांना दैनंदिन जीवनात धर्माचे आचरण करण्याचे आवाहन केले. ''जिनेंद्र भगवानांच्या चरणी वाहिलेले फूल काही क्षणांत कोमेजते; पण भगवानांच्या शिकवणुकीनुसार केलेले एक चांगले कर्म जीवनभर सुगंध देत राहते,'' असा भावस्पर्शी संदेशही त्यांनी दिला. अशी माहिती मुख्यसयोजक सजय पापडीवाल यांनी दिली. आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांचे पादप्रक्षालन करण्याचा लाभ सौ. अल्का वर्धमानजी कासलीवाल, मुंबई यांना मिळाला. तर शांतिधारेचे सौभाग्य सौ. आशा उमेशजी सावनजी समयजी चुडीवाल परिवाराला लाभले. यावेळी

विधानामध्ये सौधर्म इंद्र दिनेशजी-सौ. निताजी, केतनजी-सौ. स्वीटीजी, कुणालजी-सौ. निवेदिता सेठी परिवार, ईशान इंद्र पूनमचंदजी-सौ. जयश्री अग्रवाल, यज्ञनायक इंद्र श्रीमती कुंकुमदेवी, संजयजी-सौ. डॉ. अंजलीजी, विजयजी-सौ. माधुरी पापडीवाल परिवार, श्रेणिकजी-सौ. सुनिताजी, निखिलजी-सौ. सोनलजी कासलीवाल, महेंद्र इंद्र श्रीमती शकुंतलादेवी, आनंदजी-सौ. क्षमाजी, गीत सेठी, तसेच एक दिवसीय कुबेर इंद्र श्रीमती हेमलतादेवी आणि संतोषजी-सौ. रानो सेठी सहभागी आहेत.

विधानाचे प्रतिष्ठाचार्य अकलंक जैन असून विधान संगीतबद्ध पद्धतीने होत आहे. विविध धार्मिक विधी, पूजन-अर्चन, ध्वजारोहण आणि भाविकांच्या सहभागामुळे आर्यनंदी कॉलनी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

इंद्रध्वज विधानाचा धार्मिक लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, तसेच धर्माचा संदेश जीवनात आचरणात आणावा, असे आवाहन सकल दिगंबर जैन समाज तसेच १००८ श्री चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर, आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ट्रान्सफार्मर डोक्यावर कोसळल्याने धोंदलगावच्या भूमिपुत्राचा दुर्दैवी मृत्यू

धोंदलगाव दि.५ (प्रतिनिधी)- महा ॲक्टिव्ह इंजिनियरिंग प्रा. लि., शाखा भांडुप, मुंबई येथे तब्बल ३८ वर्षांपासून कार्यरत असलेले आणि धोंदलगावचे भूमिपुत्र सुपरवायजर अशोक किसन वाघ (वय ५४) यांचा कामाच्या ठिकाणी झालेल्या दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. ही घटना दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजता कामतगाव, ता. वसई, जि. पालघर येथे घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, इलेक्ट्रिकल इन्फ्रास्ट्रक्चरशी संबंधित हजारो किलो वजनाचा ट्रान्सफार्मर हायड्रा क्रेनच्या साहाय्याने उचलण्याचे काम सुरू होते. ट्रान्सफार्मरला उचलण्यासाठी बांधण्यात आलेला बेल्ट हायड्रा क्रेनच्या साहाय्याने वर उचलण्यात आला. मात्र ट्रान्सफार्मर वर गेल्यानंतर अचानक बेल्ट तुटल्याने हजारो किलो वजनाचा ट्रान्सफार्मर खाली कोसळला. त्यावेळी खाली काम करीत असलेले सुपरवायजर अशोक किसन वाघ यांच्या डोक्यावर ट्रान्सफार्मर कोसळल्याने त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. अशोक वाघ हे गेल्या ३८ वर्षांपासून महा ॲक्टिव्ह इंजिनियरिंग कंपनीत प्रामाणिकपणे सेवा बजावत होते. त्यांच्या निधनाने धोंदलगाव परिसरात तसेच कंपनीतील सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात वडील, दोन मुले, एक मुलगी आणि भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर धोंदलगाव मळा येथे दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी महा ॲक्टिव्ह इंजिनियरिंग कंपनीचे साईट इन्चार्ज पारस दोडल, कंपनीचे सेवानिवृत्त चेअरमन सुरेश विडोळकर, कार्यकारी चेअरमन सागर सुरेश विडोळकर यांच्यासह कंपनीची टीम धोंदलगाव येथे उपस्थित होती. त्यांनी वाघ कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले तसेच अशोक वाघ यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करताना कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ''अशोक हा आमच्या परिवारातील सदस्य होता. तो अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू आणि जबाबदार कर्मचारी होता. त्याच्या कुटुंबावर आलेले दुःख मोठे आहे. कंपनीच्या वतीने त्याच्या परिवाराला जेवढी शक्य होईल तेवढी जास्तीत जास्त मदत करण्यात येईल.'' अशोक वाघ यांच्या आकस्मिक निधनाने धोंदलगाव परिसरावर शोककळा पसरली असून, त्यांच्या दीर्घ सेवाभावी कार्याच्या आठवणींना उजाळा देत ग्रामस्थांनी व सहकाऱ्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

(पान १ वरून)

## राज्यभरात दहीहंडी जल्लोषात साजरी;...

मुलाचा मृत्यू झाला. मुंबई मनपाने दिलेल्या माहितीनुसार, दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास मालाड मालवणी येथील एकता वेल्फेअर सोसायटीमध्ये सदर घटना घडली.

दहीहंडीचा दोर एका बाजूला झाडाला आणि दुसऱ्या बाजूला इमारतीलगत असलेल्या विटांच्या खांबाला बांधण्यात आला होता. दहीहंडी फोडत असताना दोरीवर दाब येऊन विटांचा खांब कोसळला. ज्यात सात वर्षांच्या रुद्र कदमच्या डोक्याचा विटांचा तुकडा लागून तो गंभीर जखमी झाला. त्याला मालवणी जनरल रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिथे त्याला मृत घोषित केले.

पिंपरी चिंचवडमधील सांगवी परिसरात दहीहंडीचा कार्यक्रम आटोपल्यानंतर लोखंडी कमान काढताना रॉड पडल्याने ४५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. पिंपरी चिंचवडमध्ये जुनी सांगवी परिसरात दहीहंडीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यासाठी डीजेचा रॅक उभारला जात होता. रॅक उभारला जात असतानाच अचानक कोसळला.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी देखील देवीपाडा मैदान, मागाठाणे बोरिवली येथील प्रकाश सुर्वेंच्या दहीहंडी उत्सवाला भेट देत नागरिकांशी, गोपाळ, गोविंदांशी संवाद साधला. यावेळी, एकनाथ शिंदेंसमोर गोविंदा पथकांनी उंचच उंच थर लावत आपली कलाकारी दाखवून दिली.

## चेतन चौधरी आणि सिया गोयलच्या...

चेतन चौधरी आणि रितेश हिंगे यांच्यातील व्हॉट्सअॅप संभाषण पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, रितेशने हे संभाषण डिलीट केल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या माध्यमातून डिलीट केलेले चॅट रिकव्हर केले. या संभाषणातून केतनच्या हत्येच्या कटाबाबत रितेशला काही माहिती होती का, याचा तपास पोलिसांनी सुरू केला. पोलिसांच्या तपासानुसार, १८ जून रोजी चेतन आणि सियाने रितेशलाही लोहगडावर सोबत येण्यास सांगितलं होतं. मात्र, रितेशने त्यांच्यासोबत जाण्यास नकार दिला. त्यानंतर लोहगडावर नेमकं काय घडलं, याची माहिती त्याला होती का आणि हत्येनंतर आरोपींशी त्याचा नेमका किती संपर्क होता, याचा तपास आता केला जात आहे. हत्येनंतरही रितेशचा चेतन आणि सियासोबत संपर्क असल्याचं तपासात समोर आल्याची माहिती आहे. त्यामुळे हत्येपूर्वी आणि हत्येनंतर झालेल्या संभाषणांचा तपास पोलिसांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

रितेश हिंगे हा चेतन चौधरी आणि सिया गोयल यांचा वर्गमित्र असल्याची माहिती आहे. तो मूळचा बीड जिल्ह्यातील असून सध्या पुण्यातील बालेवाडी परिसरात एका खासगी कंपनीत काम करत असल्याचं समोर आलं आहे.पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, केतनच्या हत्येच्या कटाबाबत रितेशला काही माहिती होती. मात्र, त्याने हा प्रकार पोलिसांच्या निदर्शनास आणून दिला नाही, असा संशय आहे. याच पार्श्वभूमीवर त्याची चौकशी करण्यात आली आणि त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. रितेशचा या हत्येत थेट सहभाग होता का, त्याला कटाची नेमकी किती माहिती होती आणि त्याने आरोपींना कोणत्याही प्रकारे मदत केली का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## सुभाष चंद्रा यांच्याविरोधात....

तिचे संचालक अमिश पंड्या, स्पिरिट इन्फ्रा पॉवर अँड मल्टी व्हेंचर्स प्रा. लि. आणि तिचे संचालक राजीव ढोलकिया यांचा समावेश आहे. याशिवाय काही अज्ञात सरकारी अधिकारी आणि इतरांविरुद्धही गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नीता मेंघाणी यांच्या तक्रारीनुसार, एलआयसी हाऊसिंग फायनान्सने २०१८ मध्ये दोन स्वतंत्र कर्जसुविधा मंजूर केल्या होत्या. वसंत सागर प्रॉपर्टीज प्रा. लि. आणि पॅन इंडिया इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांना ५०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. डिजिटल सबस्क्रायबर मॅनेजमेंट अँड कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा. लि. आणि स्पिरिट इन्फ्रा पॉवर अँड मल्टी व्हेंचर्स प्रा. लि. यांना ४८० कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले होते.

या दोन्ही कर्जांसाठी सुभाष चंद्रा यांनी 'कंटिन्युईंग गॅरंटी' दिली होती. पहिली हमी २८ मार्च २०१८ रोजी आणि दुसरी हमी १० ऑगस्ट २०१८ रोजी देण्यात आली होती.

## राज्य सरकारकडून भरती प्रक्रियेतील...

करण्यासाठी समिती काम करणार आहे. या समितीकडून भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यावर भर दिला जाईल.

उच्च स्तरीय समितीकडून प्रश्नपत्रिका निर्मिती, गोपनीयता, डिजिटल वितरण आणि परीक्षा केंद्रांच्या सुरक्षेचा अभ्यास करण्यात येईल. पेपरफुटी, तोतया उमेदवार, संगनमत व इलेक्ट्रॉनिक गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना सूचवल्या जातील.समिती भरती परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास करून राज्य शासनाला सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे. उच्च स्तरीय समिती राज्यातील प्रत्येक महसुली विभागास भेट देऊन विद्यार्थी अथवा उमेदवार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी व इतर संबंधित हितधारकांशी चर्चा, सल्लामसलत करेल, त्यांची मते व सूचना विचारात घेऊन कार्यपध्दती सुचवणार आहे. इतर राज्यांमध्ये अवलंबिलेल्या भरती प्रक्रियेतील उत्तम पद्धतींचा तसेच आवश्यकतेनुसार इतर देशांतील परीक्षा प्रणालींचा अभ्यास देखील उच्च स्तरीय समितीकडून केली जाईल.

## दैनिक लोकविजय CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM
**Old name** - MASOOD AHMED MOHOMMED SHAIKH
**New name** - MASOOD AHMED MOHAMMED SHAIKH
**Address -** H NO 8-17-28/1 PLOT NO 19,STREET NO 1 NIZAMIYA COLONY ROSHANGATE CHHATRAPATI SAMBHAJINAGAR 431001